सप्त सम्राट्.



किंमत ३ आणे.

अनुक्रमणिका.

—॥ श्रीमहावीराय नमः ॥—

सप्त सम्राट्.

लेखक—

आप्पा भाऊ मगदूम.

प्रकाशकः—

धर्मवीर, दानवीर, श्रीमान्,

रावजी सखाराम दोशी, सोलापूर.

सन १९३६

आवृत्ति १ ली. किंमत ३ आणे.

लेखकाचे चार शब्द.

जैन धर्माची- अहिंसेची शिकवणच हिंदुस्तानाच्या पारतंत्र्याला कारणीभूत खाली, असें कित्येक इतिहासकारांनीं विधान केलें आहे. कारण अहिंसा ह्मणजे भित्रेपणा आलाच व त्यामुळें भारताची सत्ता परकीयांच्या हातीं गेली ! वस्तुतः हिंदुस्थानांत पारतंत्र्याचें बीज रुजविण्यास जैनेतर लोकच कारणीभूत झाले आहेत. अहिंसेची शिकवण भ्याडपणाची नसून वीरत्वाची आहे असें अनेक जैनराजांच्या पराक्रमावरून व स्वातंत्र्य-प्रेमावरून दाखवितां येईल. जैनांचे चोविसावे तीर्थंकर भगवान् महावीर यांच्या अहिंसेच्या उपदेशामुळेंच भारतीय जनतेच्या मनावर एक प्रकारचा वाईटच परिणाम होऊन त्याचेंच पर्यवसान पराधीनतेंत झालें. असा पुष्कळांचा तर्क आहे. परंतु भगवान महीवीरानंतरच भारताचें स्वातंत्र्य कायम टिकविणारे शिकंदर सेल्युकसासारख्या जगज्जेत्या महत्वाकांक्षी राजांचा हल्ला परतविणारे आणि कित्येक म्लेंच्छ राजांकडून खंडणी वसूल करणारे असे जे कांहीं सम्राट होऊन गेले ते सर्वही जैनच होते, हें पुढील सात सम्राटांच्या चरित्रावरून स्पष्ट दिसून येईल. आणि हे सातही सम्राट श्री महावीरांचे अनुयायीच असल्यामुळें जैनधर्मानें भ्याडपणाचें शिक्षण दिलें हें ह्मणणें मूर्खपणाचें होईल. याच्या उलट अहिंसाधर्मी जैन राजांच्या हातून ही

सत्ता जैनेतरांच्या हातीं गेल्यानंतरच हिंदुस्थानाला पारतंत्र्याचें दुर्दिन पहावें लागले.

असो, प्रस्तुतचा विषय स्वतंत्र असल्यामुळें व प्रस्तावनेवरून त्यासंबंधी बराच बोध होणार असल्यामुळें येथें जास्त लिहिण्याची जरुरी नाहीं. जैनांच्या अज्ञपणामुळें त्यांचा प्राचीन इतिहास अगदीं विस्कळित असा झाला आहे. परंतु उत्तरेतील श्रीमान बाबू कामताप्रसादजी एम्. आर. ए. एस्. यांच्या सारख्या विद्वानांच्या प्रयत्नानें बराच इतिहास आज हिंदी भाषेंत प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून हें छोटेसें चरित्रात्मक पुस्तक लिहिलें आहे.

हें पुस्तक बाबू कामताप्रसादजींच्या इतिहास ग्रंथावरूनच लिहिलें असल्यामुळें प्रथमतः कृतज्ञता बुद्धीनें त्यांचे आभार मानणें जरूर आहे. पुस्तकाची हस्तप्रत तयार झाल्यानंतर प्रो० बी. ए. चौगुले एम्. ए. बेळगांव यांनीं तें समग्र वाचून कांहीं सुधारणा सुचविल्या. व तें प्रसिद्ध करण्याचें धर्मवीर रावजी सखाराम दोशी यांनीं मनावर घेतलें ह्मणूनच इतक्या लवकर हें पुस्तक आपल्या हातीं देण्याची सुसंधि लाभली आहे. त्याचप्रमाणें आमच्या विनंतीस मान देऊन प्रगति आणि जिनविजय पत्राचे सहसंपादक श्री. केशवराव चौगुले बी. ए. एल्. एल्. बी. वकील (सांगली) यांनीं सुंदर प्रस्तावना लिहून दिली. याबद्दल वरील सर्व सहायकांचा मी अत्यंत आभारी आहे.

विशेषतः धर्मवीर रा. स. दोशी यांनीं आह्माला प्रोत्साहन देऊन हें पुस्तक क्रमशः जैनबोधकांत छापून लागलीच स्वतंत्र पुस्तकरूपानेंही प्रसिद्ध केलें याबद्दल पुन्हां एकवार त्यांचे आभार मानून हे चार शब्द पुरे करतो.

श्रीमहावीर निर्वाण
संवत २४६३
कार्तिक शु १

आपला नम्र,
आ. भा. मगदूम.
(से. जैन महाराष्ट्र कविमंडळ सांगली)

प्रस्तावना.

जैन वाङ्मय, जैन संस्कृति व जैनसमाज यांचे भारतीय इतिहासांत फार महत्त्व आहे. तथापि हिंदी विद्वानांचें लक्ष या विषयाकडे जावें तितकें गेलेलें नाहीं. जें कांहीं कार्य या बाबतींत दिसून येत आहे तें सर्व पाश्चात्य पंडिताकडोन झालेलें आहे.

भगवान् महावीरापर्यंत या भारतखंडांत मुख्यत्वेंकरून जैनांचीच संख्या होती. तदनंतर महात्मा गौतमबुद्धाच्या अनुयायांची संख्या वाढली. बौद्धाच्या ऱ्हासानंतर वैदिकानुयायांची संख्या वाढून हल्लीं परदेशी (ख्रिश्चन व इस्लाम) धर्माच्या अनुयायांची संख्या वाढत आहे. यामुळें हिंदुस्थान देश अधोगतीस चालला आहे व यास कारण जैनांचें " अहिंसा-तत्व " असेंच कांहीं जैनधर्मद्वेष्टे हिंदु लेखक जाणूनबुजून लिहिण्याचें धाडस करीत आहेत. " अहिंसा परमो धर्मः " हें एक जैनधर्मांतील मूलभूत व व्यापक तत्व आहे हें खरें आहे. परंतु जैनधर्मद्वेषी लेखक " जैनधर्म हा निवृत्तिमार्गपर व साधुसंन्याश्यांचाच धर्म आहे " असें समजून जैनधर्मावर वाटेल तो खोटा आरोप करण्यास धजतात. वस्तुतः जैनधर्म हा " प्रवृत्तिपर व्यावहारिक गृहस्थांचाहि धर्म आहे." जैनेतर लेखकांनीं सदरची प्रवृत्तिपर जैनधर्माची शिकवणूक डोळ्यांआड केली असल्यानें, ते काढीत असलेला निष्कर्ष आपोआप चुकीचा ठरत आहे हें

त्यांनाच स्वतंत्रपणें विचार करून दिसून येणार आहे. जैनांच्या अहिंसावादामुळें हिंदुस्थान स्त्रैण बनला नाहीं. उलट जैनधर्मी यांनीं राज्यविस्तार व धर्मप्रसार साधण्यासाठीं रणांगणांवर तरवारी परजल्या आहेत असेंच भारतवर्षाच्या गतकालीन इतिहासाकडे दृष्टि फेंकल्यास दिसून येणार आहे. महावीर-पूर्वकालीं केवल भरतखंडांतच नव्हे तर इतर खंडांतूनसुद्धां जैन व्यापारी व साधु जात असत व भारतीय वस्तूंचा व तत्वज्ञानाचा प्रसार करीत असत. भगवान् महावीरानंतर अल्पसंख्यांक जैनांनीं आपल्या बाहुबलाचे जोरावर राज्यें केलीं; बुद्धिवैभवानें ज्ञानपरिपूर्ण अशीं ग्रंथसंपत्ति निर्माण करून जैनतत्वज्ञानाचा प्रसार केला. हस्तकौशल्यानें नाना वस्तु निर्माण करून दुनियेस डुलविलें व चारित्रबलानें धर्म-प्रभावना केली व अभूतपूर्व संघशक्तीनें आजपर्यंत अनेक हल्ल्यास तोंड देवून ते टिकून राहिले. सम्राट भरत, सम्राट श्रेणिक उर्फ बिंबीसार, चंद्रगुप्त बिंदुसार, अशोक, खारवेल, कुमारपालादि जैन राजांनीं ज्याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांत राज्य केलें त्याचप्रमाणें दक्षिण हिंदुस्थानांत राष्ट्रकूट, होयसाल, गंग वगैरे वंशाच्या जैन-धर्मी राजांनीं राज्यें केलेलीं आहेत. थोडक्यांत देशरक्षण, हस्तकौशल्य, पांडित्य व चारित्र्य वगैरे सर्व बाबतींत जैन समाज महावीरपूर्वकालीं आदर्शभूत होताच व नंतरही मुसलमानांच्या आगमनापर्यंत तो तसाच होता. दक्षिण हिं-

दुस्थानांत तर परवां परवांपर्यंत जैनांनीं राजवैभव भोगलेलें आहे.

जैनांच्या अहिंसातत्वाची व्यापकता फारच मोठी आहे. अहिंसावादी जैन फारच निरपेक्ष असतो परंतु त्याची कार्यतत्परता मात्र उत्कट असते. " त्याला मरणाची तर मुळींच भीति नसते, प्राणिमात्रांचें संरक्षण करणें हें त्याचें आद्य कर्तव्य असतें. कोणतेंही कृत्य युद्धानेंच होऊं शकत असेल तर जैनवीर युद्ध करण्यास केव्हांही मागें पाहणार नाहीं. सम्राट खारवेलासारखे योद्धे जैनधर्मी होते व त्यांनीं राज्यपालनासाठीं केलेलीं युद्धें इतिहासांत प्रामुख्यानें झळकत आहेत. यावरून असें दिसून येईल कीं जैनांचें " अहिंसातत्व " व " जैन योद्धे " ही शब्दरचना परस्पर विसंगत अशी नाहीं. ही वस्तुस्थिति आमचे मित्र श्री० आ० भा० मगदूम उर्फ " कवि वीरानुयायी " यांनीं या " सप्त सम्राट " द्वारें फारच उद्‌बोधक रीतीनें मांडणी करून मराठी वाचकवृंदापुढें ठेविली आहे व त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

प्रथमच लिहिल्याप्रमाणें जैन वाङ्मयाचा व इतिहासाचा अभ्यास फार काळजीपूर्वक व पुष्कळ मोठ्या प्रमाणांत व्हावयास पाहिजे. साहित्यांत कथा वाङ्मय विपुल आहे, व त्याचाही अभ्यास व्हावयास पाहिजे कारण त्याचा जैनांचा सामाजिक इतिहास लिहितांना फारच उपयोग होणार आहे.

सामाजिक इतिहासाप्रमाणेंच जैन वाङ्मयालाही जैनवीरांच्या इतिहासाचा अतिशय उपयोग आहे, तसाच उपयोग शिक्षणांतही या वाङ्मयाचा आहे. या दृष्टीनें श्री. मगदूम उर्फ कवि वीरानुयायी यांच्या या परिश्रमपूर्वक तयार असलेल्या कृतीचा उपयोग होईल अशी माझी खात्री आहे. श्री० मगदूम हे जैन वाङ्मयोपासक आहेत व त्यांच्या हातून उत्तरोत्तर जैनी संस्कृतीचा व इतिहासाचा प्रकाश वाङ्मय द्वारा सर्वत्र पडो अशी इच्छा प्रकट करून मी ही प्रस्तावना पुरी करितों.

सांगली.
ता. १४।११।१९३६

केशवराव चौगुले
वकील.

सप्त सम्राट्.

१ सम्राट् भरत.

या पुण्यशाली देशांत जन्म घेऊन ज्यानें अखिल जगताच्या साम्राज्य पदावर पहिल्यानें पाऊल ठेविलें आणि आपल्या नांवानें ही पुण्यभूमि **भरतखण्ड** या नांवानें गाजविली त्या चक्रवर्ति भरताचें चरित्र ऐकण्यास कोण उत्सुक होणार नाहीं !

'नाभेःसुतःस वृषभो मरुदेवीसूनुर्यो वै चचार मुनियोग्यचर्या'

असा उल्लेख भागवत पुराणांत करून ज्यांना आपले आदितीर्थंकर समजतात असे सर्वांना पूज्य असलेले जे वृषभनाथ त्यांच्या पोटींच चक्रवर्ति भरताचा जन्म झाला होता. भगवान् वृषभनाथांचा काल फार प्राचीन आहे. कृत-युग सुरू झाल्याबरोबर कल्पवृक्षांचा नाश झाला आणि सर्वदा सुखी असणाऱ्या लोकांना चरितार्थाची मोठी पंचाईत पडली. त्यावेळीं वृषभनाथांनीं प्रजेला निरनिराळे उद्योगधंदे सुचवून समाजरचनेच्या सोईसाठीं क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा तीन वर्णांची उत्पत्ति केली व त्यांचें आधिपत्य स्वीकारून अयोध्या शहरांत त्यांनीं राज्य करण्यास सुरवात केली. कित्येक वर्षानंतर त्यांना वैराग्य प्राप्त झालें व त्यांनीं जिनदीक्षा धारण करून अयोध्येचें राज्य भरताच्या स्वाधीन केलें. हाच युवराज भरत पृथ्वीतलावर पहिला चक्रवर्ति झाला. याला बाहुबली वगैरे अनेक भाऊ होते व त्यांनाही वृषभनाथांनीं निरनिराळ्या प्रांताचें राज्य तोडून दिलें होतें. भरत या नांवाचे अनेक राजे या भारतव-

षांत होऊन गेले आहेत परंतु ज्याच्या नांवानें हा देश अद्यापि भरतभूमि ह्मणून प्रसिद्ध आहे तो प्रचंडप्रतापी वीर भरत भगवान् वृषभपुत्र होता हें विसरून चालणार नाहीं. प्रजाहितदक्ष, बुद्धिमान्, महातेजस्वी असा तो भरतेश्वर मोठ्या उत्साहानें अयोध्येंत राज्य करीत होता.

ती सुवर्ण प्रभात होती, चक्रवर्ति भरतेश्वर दरबारांतील उच्च सिंहासनावर अधिष्ठित झाला होता. अनेक राजे व मांडलिक आप आपल्या स्थानावर विराजमान झाले होते, भाट लोक महाराजांच्या पराक्रमाची व वैभवाची स्तुतिस्तोत्रें गात होते, त्यावेळचें तें भरताचें वैभव इंद्रसभेलाही लाजविण्यासारखें होतें.

अशा वैभवांत भरतेश्वर विराजमान होता, तोंच त्याचा मुख्य आयुधशालारक्षक विनयपूर्वक वंदन करून हर्षित हृदयानें महाराजांना ह्मणाला–" हे प्रतापवंता, प्रभो, आपल्या आयुधशाळेंत सूर्यबिंबाप्रमाणें तेजस्वी, व अनेक देवतांनीं रक्षित असें चक्ररत्न उत्पन्न झालें आहे. ज्याच्या तेजानें पृथ्वींतील सर्व राजांचे नेत्र दिपून जावेत, ज्याला पाहतांच मदांध झालेल्या राजांना भयकंप सुटावा, आणि ज्याच्या साह्यानें सर्व पृथ्वी आपल्या आधीन व्हावी असें हें दिव्य चक्ररत्न आपल्या आयुधशाळेची शोभा द्विगुणित करीत आहे. हे प्रभो, आपण स्वतः येऊन त्याचें निरीक्षण करावें."

आयुधशालारक्षकाचें हें भाषण ऐकून भरत आनंदित होऊन

विचार करीत आहे, तोंच अंतःपुरांतील सेवकांनीं मंगळ वाद्यें वाजवीत दरबारांत प्रवेश केला. सम्राट् भरताचें यशोगान करून त्यांनीं राजास सांगितलें कीं—" महाराजाधिराज, आपल्याला बालसूर्याप्रमाणें तेजस्वी असें पुत्ररत्न प्राप्त झालें आहे." हें दुसरें आनंदकारक वृत्त ऐकून भरताच्या हृदयांत आनंदलहरी हेलावूं लागल्या. मनुष्याच्या पुण्यकर्मांचा जेव्हां उदय होतो तेव्हां सर्व बाजूंनीं एकाच वेळीं त्याला संपत्ति, संतति, कीर्ति व सर्वप्रकारची सफलता मिळूं लागते. त्याचे शत्रूही मित्र बनतात ! त्याचप्रमाणें चक्रवर्ति भरत ही आनंदवार्ता ऐकत आहे तोंच धर्माधिकारी सेवकानें दरबारांत प्रवेश केला.

तो म्हणाला— " महाराज आज वसंत ऋतूप्रमाणें जिकडे तिकडे उपवनांत प्रफुल्लता दिसत आहे. हिंस्रपशु वैरभाव सोडून प्रेमानें खेळत आहेत. आणि कैलास पर्वतावर देवदेवतांचा जमाव झाला असून सर्वत्र वृषभनाथांचा जयजयकार ऐकूं येत आहे. व आकाशांतील देवाकडून दिव्य पुष्पवृष्टि होत आहे. यावरून हा सर्व प्रकार भगवान वृषभनाथांना केवलज्ञान झाल्याचें दिग्दर्शित करीत आहे."

हें आनंदवृत्त ऐकून भरतेश्वर आपल्या रत्नजडित सिंहासनावरून खालीं उतरला. आणि सात पाउलें पुढें जाऊन नम्रतेनें त्यानें वंदन केलें. व हें शुभवृत्त सांगणाऱ्या धर्माधिकाऱ्याला आपलीं रत्नजडित वस्त्राभरणें देऊन

संतुष्ट केलें. सर्वज्ञ भगवंताच्या केवलज्ञानोत्सवास जाण्याची तयारी चालविली. नगरवासीजन महाराजाबरोबर कैलास पर्वताकडे जाण्यास निघाले. भरतानें आपल्या सर्व राण्या, बंधुजन, व प्रधानादि सर्वांसह कैलास पर्वताकडे प्रयाण केलें.

समवसरणांत गेल्यानंतर तेथील भव्य शोभा पाहून त्यांचीं हृदयें प्रफुल्लित झालीं. भरतानें मोठ्या विनयानें भगवंतांना वंदन करून अनेक प्रकारें त्यांचीं स्तुति केली, व तो धर्मोपदेश ग्रहण करण्याच्या हेतूनें मानवसभेंत जाऊन बसला. त्यानें धर्मासंबंधीं अनेक प्रश्न विचारून आपलें समाधान करून घेतलें व पुनः पुनः त्यांचीं स्तुतिस्तोत्रें गात तें सर्वजण परत कौशलपुरास आले.

पुत्रजन्माचा आनंद कोणाला होणार नाहीं? आणि तोही चक्रवर्तीचा प्रथम पुत्र! पण भरतानें भगवान् वृषभनाथांना केवलज्ञान झाल्याचें ऐकतांच पुत्रजन्मोत्सव व चक्ररत्नाचा स्वीकार या दोन्ही गोष्टी बाजूस ठेऊन प्रथमतः केवल कल्याणिकोत्सव केला. यावरून भरताची धर्म प्रीति दिसून येते. असो. कैलासपर्वतावरून परत आल्यानंतर पुत्रजन्मोत्सव साजरा केला. सर्व शहर शृंगारून नगरवासियांनीं मोठा आनंदोत्सव सुरू केला. मंगलवाद्यांच्या ध्वनीनें व पताकांच्या फडफडाटानें शहर दणाणून गेलें. यासमयीं भरतानें अलोट संपत्ति दान दिली, व आपल्या बंधुवर्गालाही संतुष्ट

केलें. आणि नंतर दरबारांतील मंत्रिजनासह तो आयुधशाळेंत गेला व चक्ररत्नाची विधिपूर्वक पूजा करून दिग्विजय करण्याचें ठरविलें.

चक्ररत्नाची प्राप्ति, पुत्रजन्मोत्सव आणि पित्याचें केवलज्ञान या प्रकारचा आनंदाचा त्रिवेणीसंगम भरतासारख्या महापुण्यशाली पुरुषाशिवाय एकाच वेळीं कोणाला बरें लाभणार आहे ?

अशा प्रकारचें आनंदसुख उपभोगीत असतां त्याला दिग्विजयाची इच्छा उत्पन्न झाली व त्यानें आपल्या सेनापतीस विश्वविजयी सेनेचें संघटन करण्यास सांगितलें. सेनापतीनें सर्वप्रकारच्या सैन्याची तयारी केली व दुंदुभीनाद सुरू केला. साम्राट् भरतेश्वरानें रथारूढ होऊन त्या अफाट सैन्यासह अयोध्यापुर सोडिलें. अयोध्येच्या पूर्व व दक्षिण दिशेचे सर्व देश जिंकून त्यानें आपल्या प्रबल प्रतापानें आपली सत्ता प्रस्थापित केली. व त्यानंतर उत्तरेकडे सिंधुनदीच्या पलीकडे मोर्चा वसविला. विजयार्द्धपर्वतापर्यंतचे अनेक देश जिंकून म्लेंच्छ खंडावरही विजय मिळविला—या दिग्विजयांत कित्येक राजे शरण आले. कित्येकांनीं नजराणे देऊन भरताची कृपा संपादन केली व कित्येकांनीं आपल्या सुंदर मुली त्याला अर्पण करून सख्य जोडिलें. हे म्लेंच्छ देश जिंकीत असतां मध्यभागांत राज्य करणाऱ्या चिलात व आवर्त या बलवान् म्लेंच्छ राजांनीं भरताशीं

मोठ्या पराक्रमानें सामना केला. त्यांना अनेकप्रकारच्या विद्या प्राप्त झालेल्या असल्यामुळें त्यांनीं भरताचें प्रभुत्व स्वीकारण्याचें नाकारून युद्ध केलें. त्यावेळीं भरताबरोबर दिग्विजयार्थ निघालेला कुरुदेशचा राजपुत्र जयकुमार यानें मोठ्या शौर्यानें लढून त्या म्लेंच्छांचा पराभव केला. अशा प्रबल राजांचा पराभव झाल्यामुळें इतर म्लेंच्छ राजांनीं भरताचें सार्वभौमत्व कबूल करून त्याला नजराणे अर्पण केले. याप्रमाणें सर्व पृथ्वीवर आपली सत्ता प्रस्थापित करून विजयी भरतेश्वर आपल्या सैन्यासह वृषभाचल पर्वतावर आला व तेथें आपली विजयप्रशस्ति लिहून अनेक राजराजेश्वरांकडून भेट घेत घेत मोठ्या उत्सवानें तो अयोध्यापुरीजवळ आला.

जरी भरतानें विश्वविजय मिळविला होता, तरी अयोध्यापुरींत प्रवेश करतेवेळीं त्याचें चक्ररत्न वेशींतून आंत जाईना. त्याचा तटस्थपणा पाहून भरतानें आपल्या मंत्रिजनास बोलाविलें. हा प्रकार पाहून विद्वान् मंत्री म्हणाले– 'महाराज सर्व पृथ्वींतले राजे जरी आपल्यापुढें नम्र झाले, तरी आपले बाहुबली वगैरे बंधुजन आपणांस भेटावयास आल्याचें दिसत नाहीं. जोपर्यंत आपली सत्ता ते कबूल करीत नाहींत, तोपर्यंत हें चक्ररत्न नगरांत प्रवेशणार नाहीं ' याप्रमाणें मंत्रिजनांनीं सांगतांच भरतानें प्रतापशाली बाहुबलीस एक पत्र लिहून आपलें प्रभुत्व स्वीकारण्याविषयीं कळविलें. परंतु महाबाहु बाहुबलीनें त्याचें प्रभुत्व न स्वीकारल्यामुळें त्या दोघांचें

युद्ध सुरूं झालें. दोघेही महापराक्रमी असल्यामुळें त्यांचें द्वंद्वयुद्ध पाहण्यास सर्व देशचे राजे जमले होते. जलयुद्ध, नेत्रयुद्ध, व मल्लयुद्ध याप्रमाणें द्वंद्व होऊन त्या प्रत्येक युद्धांत भरताचा पराभव झाला. तेव्हां नाइलाजानें त्यानें चक्ररत्न बाहुबलीवर सोडलें. तें आपल्या भावाचें कृत्य पाहून बाहुबलीस तत्काल वैराग्य उत्पन्न झालें व तो दीक्षार्थ वनांत निघून गेला. भरतालाही हा प्रकार पाहून मोठीं वाईट वाटलें, पण होणारें झालेंच !

नंतर भरतानें चक्ररत्नासह अयोध्येंत प्रवेश केला. प्रत्यक्ष इंद्रालाही लाजविणाऱ्या आपल्या वैभवानें सर्व जगाला दिपवीत भरतानें अयोध्येच्या राजसिंहासनावर पाऊल ठेविलें. सर्व पृथ्वींतील राजाकडून त्याचा पुन्हां राज्याभिषेक झाला व ' चक्रवर्ति ' ह्मणून सर्वजण त्याला वंद्य मानूं लागले.

या दिग्विजयांत भरतेश्वरानें हत्ती, घोडे आणि पुष्कळ जडजवाहीर मिळवून आणलें होतें. व कित्येक रूपवान् राजकुमारींशीं विवाह केला होता. भरताचें त्या वेळचें वैभव अभूतपूर्व होतें, त्याच्या सत्तेंत ज्यांचें रक्षण देवताकडून केलें जात असे, अशीं चौदा रत्नें व नऊ निधी होते. त्याच्या अफाट सैन्यांत ८४ लक्ष हत्ती, ८४ लक्ष रथ, १८ कोटि घोडे, व ८४ कोटि पायदळ होतें. या षट्खंड पृथ्वी तलावरील ३२ हजार मुकुटबद्ध राजे त्याचे मांडलिक होते. त्याच प्रमाणें कित्येक द्वीप, व हजारो बंदरें त्यांच्या ताब्यांत होतीं.

चक्रवर्ती भरत धर्मशील व न्यायी असल्यामुळें त्याच्या प्रजेला कोणत्याही प्रकारें त्रास होत नव्हता. अत्याचार, अन्याय व भेदभाव नसल्यामुळें त्याची सर्व प्रजा अत्यंत सुखसंपन्न होती.

चक्रवर्ति भरतेश्वर जरी षट्खंड पृथ्वीचा अधिपति होता तरी तो या वैभवमोहांत गुंतून कधीं ही धर्मक्रियेपासून भ्रष्ट झाला नाहीं. धनिक लोकांना ज्या प्रमाणें नेहमीं धनचिंता असतें त्याप्रमाणें त्याला कशाची ही चिंता नव्हती. पूर्वपुण्यबलानें त्याला जरी इतकें ऐश्वर्य प्राप्त झालें होतें तरी तो पाण्यांत असणाऱ्या कमलाप्रमाणें संसारांत राहूनही त्यापासून अलिप्त होता व सर्वदा त्याचें लक्ष आत्मचिंतनाकडेच असे.

चक्रवर्ति भरतानें धर्मक्रियांच्या सुव्यवस्थेसाठीं 'ब्राम्हण' वर्णाची स्थापना केली, व त्यांना पुष्कळ द्रव्य देऊन त्यांच्याकडे पुढीलप्रमाणें व्यवस्था सांगितली होती– १ यजन २ याजन ३ अध्ययन ४ अध्यापन, दान देणें व घेणें. याप्रमाणें नित्यक्रिया करून धर्मज्ञान संपादन करणें. त्याचप्रमाणें क्षत्रियांनींही सदाचारी बनून राजनीति व धर्मशास्त्र यांचें अध्ययन करावें असा प्रबंध केला. याप्रमाणें राजनीति व सुव्यवस्था लावून, नंतर भरतेश्वरानें सर्व देशांत जैनधर्माचा प्रसार केला व कैलास पर्वतावर सुवर्णमय रत्नजडित अशीं चोविस जिनमंदिरें बांधिलीं.

याप्रमाणें सर्व प्रकारची राज्यव्यवस्था व समाजव्यवस्थां लावून भरतेश्वर विपुल ऐश्वर्य भोगीत असतां त्याला या नश्वर संसाराचा वीट आला व आत्मोद्धार करण्याकरितां त्यानें आपला पुत्र अर्ककीर्ति याला राज्याभिषेक करून वैराग्य धारण केलें.

ज्यानें आपल्या पराक्रमानें सर्व पृथ्वी जिंकून चक्र-वर्तित्व मिळविलें तो सम्राट् भरत आतां माहात्म भरत बनला. गृहस्थावस्थेंत नेहमीं आत्मचिंतनांत याचें आयुष्य व्यतीत झाल्यामुळें दीक्षा घेतल्याबरोबर त्यांना केवलज्ञान झालें. इहलोकाप्रमाणेंच त्यानें मुक्तिलक्ष्मीवरही विजय मिळविला.

या जगतीतलावर सार्वभौमसत्ता गाजवून चक्रवर्तित्व मिळविण्याचा पहिला मान भरताचा असल्यामुळेंच या आ-र्यखंडाला भरतभूमि हें यथार्थ नाम प्राप्त झालें आहे. भर-ताचा काल जरी अनादि असला तरी त्याचें अस्तित्व ऋग्वे-दादि हिंदू ग्रंथांनीं मान्य केलें आहे. परंतु जातिद्वेषामुळें या भरतभूमीवर नांव प्रस्थापित करणारे कित्येक काल्पनिक भरत जरी उत्पन्न झाले असले तरी अजिंक्य अशा वृषभ-पुत्र भरताच्याच नांवानें ही भरतभूमी जगाच्या अंतापर्यंत त्याचें यशोगान करीत राहणार आहे !

सम्राट् भरताचें हं चरित्र त्याच्या क्षत्रिय वंशजांना अभिमान व स्फूर्ति उत्पन्न करो !

---

२ सम्राट् श्रेणिक उर्फ बिंबिसार

अर्वाचीन इतिहासांत पहिला सम्राट् हा मान चंद्रगुप्त मौर्याला जरी मिळाला असला तरी इ. सनांच्या पूर्वी सुमारें ६००–७०० वर्षें पर्यंतचा काळ ऐतिहासिक मानला जातो व तेथपर्यंतचा इतिहास समजण्यास भक्कम पुरावे ही मिळतात. त्याकाळीं उत्तर हिंदुस्तानांत अठरा राज्यें प्रमुख होतीं असें ' बुद्धिष्ट इंडिया ' या ग्रंथांत लिहिलें आहे.

त्यापैकीं कोसलचें राज्य मोठें प्रसिद्धीस आलेलें होतें. व त्याची राजधानी हिमालयाचे पायथ्याशीं रात्या नदीच्या काठीं श्रावस्ती नगरी होती. आणि त्याचप्रमाणें लवकरच मगध देशचें राज्य ही मोठें उदयास आलें. त्याची राजधानी गंगेच्या काठीं राजगृह नांवाची होती. तेथें शिशुनाग वंशाचे क्षत्रिय राजे राज्य करीत होते. त्यापैकीं पांचवा राजा श्रेणिक उर्फ बिंबिसार हा होय !

युवराज श्रेणिकावर इतराजी झाल्यामुळें त्याला बालपणांतच हद्दपारीची शिक्षा मिळाली होती.
त्याचा पिता उपश्रेणिक हा वृद्धपणीं एका स्त्रीच्या मोहपाशांत सांपडल्यामुळें तिच्या सांगण्याप्रमाणें त्यानें हें कृत्य केलें होतें. युवराजपदाचा त्याग करून जाण्यांत श्रेणिकानें बालपणांतच मोठें धैर्य दाखविलें होतें. या त्यागामुळें त्याला जरी अनेक प्रकारें संकटें भोगावीं लागलीं तरी निरनिराळ्या देशांत प्रवास घडून त्याचा अनुभव ही वाढला होता. बौद्ध भिक्षू-

च्या सहवासामुळें त्याची बौद्ध धर्मावर श्रद्धा बसली होती. प्रवासांत असते वेळीं त्याचें अनेक प्रकारचें चातुर्य पाहून नंदश्री नांवच्या एका ब्राह्मणकन्येनें त्याच्याशीं विवाह केला होता. व तिच्या सहवासांतच श्रेणिक आपला काल कंठीत होता. इकडे वृद्ध मगधाधीश उपश्रेणिक मृत्यु पावल्यामुळें गादीसंबधीं बराच घोटाळा माजला. शेवटीं प्रधान मंडळींनीं श्रेणिकाचा शोध करून त्यालाच विधिपूर्वक राज्याभिषेक केला.

उपश्रेणिकाच्या शिथिलतेमुळें मगध राज्यांत बरीच बेबंदशाही माजली होती व सीमाप्रांतावर शत्रूंनीं आपले पाय पसरण्यास सुरवात केली होती. राज्याभिषेक होतांच श्रेणिकानें प्रथमतः सैन्यसंघटन करून लिच्छवी वंशीय राजाशीं युद्ध सुरू केलें.राजा श्रेणीकाचें शौर्य पाहून लिच्छवी राजा चेटक यानें त्याच्याशीं सलोखा केला व आपली कन्या चेलनादेवी त्याला अर्पण केली. या विवाहामुळेंच श्रेणिकाच्या आयुष्यास एक प्रकारें निराळें वळण लागलें. श्रेणिकाचा हा पहिला विजय होता, आणि या विजयामुळेंच त्याचा भोंवतालच्या राजांवर चांगलाच वचक बसला आणि सर्वांना स्नेह सम्पादून राहणें भाग पडलें.

सम्राट् चन्द्रगुप्ताला जें अपूर्व यश प्राप्त झालें होतें, आणि त्याला जें भरताचें स्वातंत्र्य राखतां आलें त्याला कारण मगधराजाचें साहाय्य हेंच होय. मगधाची अफाट सेना त्याला जर

मिळालीं नसती तर कदाचित् निराळीच घटना झाली असती कारण मगधराज्याचें सामर्थ्य सर्वांपेक्षां मोठें होतें व प्रत्यक्ष शिकंदरालासुद्धां त्याचाच मोठा वचक होता. या मगधराज्याच्या सामर्थ्याचा आणि सम्राट चंद्रगुप्ताच्या यशाचा पाया श्रेणिकानें घातला होता असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

इ. सनापूर्वी ५०० च्या सुमारास इराणचा बादशहा डरायस हा भरतावर आला होता. व त्यानें सिंधूनदी-पर्यंतचा मुलूख आपल्या ताब्यांत घेतला होता. त्याला रोकण्याचें पहिलें महत्कार्य राजा श्रेणिकानें केलें होतें. ही एकच गोष्ट त्याच्या अतुल पराक्रमाची साक्ष देत आहे. त्या काळच्या एकंदर विकट परिस्थितींत त्याला जरी सर्व देशाचें सम्राट्त्व संपादतां आलें नाहीं तरी त्यानें आपल्या आयुष्यांत भावी सम्राटाच्या यशाचा पाया घालून ठेविला होता. आणि त्यामुळेंच मगध राज्याला इतिहासांत इतकें महत्त्व प्राप्त झालें. यानें कोसल, लिच्छवी वगैरे अनेक राज्यें जिंकून घेतलीं.

याच्याच कारकीर्दीत जैनधर्मप्रवर्तक शेवटचे तीर्थंकर भगवान महावीर यांचा उदय झाला. श्रेणिकाची राणी चेलनादेवी ही जैनधर्मी असल्यामुळें तिच्या व त्याच्या मतांत अंतर पडून अखेर राणीच्या म्हणण्याप्रमाणें श्रेणिकाला बौद्ध धर्माचा त्याग करून पुन्हां जैनधर्म स्वीकारावा लागला. श्रेणिक मोठा चतुर व विद्वान होता. त्यानें अनेक प्रकारें जैन

धर्मगुरूंचीं परीक्षा करून व जैनतत्वाचें पूर्णपणें ज्ञान करून घेऊनच तो धर्म स्वीकारला. पुढें भगवान् महावीर प्रभूंची भेट झाल्यानंतर त्यानें अनेक प्रकारच्या शंकांचें निरसन करून घेऊन त्यांचें शिष्यत्व पत्करलें. हल्लीं जैन लोकांत जे कथाग्रन्थ आहेत त्या पैकीं पुष्कळ श्रेणिक राजाला उद्देशूनच सांगितलेले आहेत. त्यावरून त्यानें किती सूक्ष्म दृष्टीनें अभ्यास करून नंतर जैनधर्म स्वीकारला हें दिसून येतें.

अशोकानें ज्याप्रमाणें बौद्ध धर्माच्या प्रसारासाठीं शक्य तितका प्रयत्न केला त्याच प्रमाणें सम्राट् श्रेणिकानें जैन धर्माच्या प्रसारासाठीं प्रयत्न केला. + त्याचा मुलगा युवराज अभयकुमार उर्फ अजातशत्रु यानें इराणच्या राजपुत्रालाही जैनधर्म स्वीकारण्यास लाविलें होतें. श्रेणिकाच्या एकंदर चरित्रावरून पहातां तो अत्यंत नीतिमान् स्वातंत्र्यप्रिय, धर्म निष्ठ आणि विद्वान् होता असें दिसून येतें. त्यानें आपलें शेवटचें आयुष्य धर्मध्यानांतच घालविलें. कित्येक इतिहासांत ' श्रेणिकाचा त्याच्या मुलानें खून केला. ' असें लिहिलें आहे तें सर्वथा चुकीचें आहे. कारण त्याचा मुलगा अजातशत्रु हा पित्याहून ही धार्मिक व न्यायी ह्मणून प्रसिद्ध आहे. तेव्हां त्याच्या हातून हें कृत्य होणें अशक्य आहे. ❀

+ टीप–हा उल्लेख दि. जैनाच्या श्रेणिकचरित्रांत नाहीं.

❀ श्रेणिकानंतर त्याचा मुलगा कुणिक हा राज्यावर बसला, अभयकुमारानें दीक्षा घेतली. यास्तव कुणिक राजा-

सम्राट् श्रेणिक हा अहिंसाधर्मी होता तरीही राष्ट्ररक्षण करण्यांत त्यानें पुष्कळ युद्धं केली. जैनधर्मांतील अहिंसा नीतियुद्धाच्या आड कधींही येत नाहीं हें अशा सम्राटांच्या चरित्रावरून सिद्ध होतें. अर्वाचीन इतिहासांत सम्राट् श्रेणिक ऊर्फ बिंबिसार याच्यासंबंधीं संपूर्ण उल्लेख जरी आढळत नसला तरी डरायससारख्या पहिल्या परकीय शत्रूला परत पाठवून विजयाचें पहिलें तोरण त्यानेंच बांधिलें आहे. डळमळित झालेल्या मगधराज्याचा भक्कम पाया घालून त्याचें सामर्थ्य श्रेणिकानेंच वाढविलें व त्यामुळेंच पुढील राजांना यशःप्राप्ति सुलभ झाली. धर्मनिष्ठ सम्राट् श्रेणिकाचें हें चरित्र सर्वांना सन्मार्गदर्शक होवो !

सच अजातशत्रु असें नांव आहे. हा कुणिक दुष्ट होता. त्यानें आपल्या बापास अर्थात श्रेणिकास कारागृहांत टाकिलें होतें. शेवटीं आईच्या--चेलनेच्या उपदेशानें तो त्याला कारागृहांतून मुक्त करण्याकरितां गेला असतां हा मला मारण्यासाठीं आला असें समजून श्रेणिकानें आपला तरवारीनें घात करून घेतला अशी श्री शुभचंद्राचार्यकृत श्रेणिकचरित्रांत कथा आहे.

३ सम्राट् चंद्रगुप्त

फार प्राचीनकालच्या पौराणिक हकीगतीवरून अनेक चक्रवर्ति राजे झाल्याचें दिसून येतें. परंतु ज्याला ऐतिहासिक आधार मिळतो किंवा आधुनिक इतिहासकारांनीं जेथून ऐतिहासिक काल मानला आहे त्यांत सम्राट् चंद्रगुप्त यालाच पहिला, चक्रवर्तित्वाचा मान मिळतो.

सम्राट् चंद्रगुप्त याचा जन्म जैनधर्मी क्षत्रिय मौर्य कुलांत झाला होता. त्याच्या पित्याला शत्रूंनीं ठार मारल्यामुळें चंद्रगुप्ताची गर्भवती माता आपला जीव बचावून पाटलीपुत्रास येऊन राहिली. व अशा संकट कालांतच आपल्या मातेचें दुःख हरण करणारा तेजस्वी वीर जन्माला आला. बालपणीं अनेकप्रकारचीं संकटें भोगून यानें स्वपराक्रमानें नंदराजाला पदच्युत करून मगधाचें सिंहासन बळकाविलें. व पेशावरापासून ब्रम्हदेशापर्यंत आणि हिमालयापासून दक्षिणसमुद्रापर्यंत आपला राज्यविस्तार केला. मध्य आशियांतून हिंदुस्तान जिंकण्याच्या उद्देशानें आलेल्या बलाढ्य शत्रूंचा पराभव करून यानें भरताचें स्वातंत्र्य कायम राखिलें. म्हणूनच इतिहासांत याला पहिलें स्थान मिळालें आहे.

इ. सनापूर्वी सुमारें चौथ्या शतकांत हिंदुस्थानांत सर्वत्र बेबंदशाही माजून राहिली होती. एकछत्री असा अम्मल कोणाचाही नव्हता. अनेक लहान लहान राज्यें प्रस्थापित झालीं होतीं. त्यामुळें परकीय शत्रूंशीं सामना कर-

ण्यासारखें कोणांतही बल नव्हतें. आपापसांतील दुहीमुळें व ईर्षेमुळें सर्वांचें जीवन धोक्याचें झालें होतें. प्रजेला तर कोणत्याच प्रकारें सुख नव्हतें. लहान लहान राज्यांतील सीमाप्रांतावर नेहमीं झगडे चालत व त्यामुळें गरीब प्रजेला फार त्रास होत असे. शेजारच्या राज्यावर जरी परचक्र आलें तरी त्याच्या मदतीला धावून जाण्या ऐवजीं त्याच्या नाशांतच आनंद मानणारे राजे फार होते. प्रत्येकाला स्वतः च्या कुलाचा व गादीचा फाजील अभिमान वाटे व त्यामुळें अशा लहान राज्यांत कधींही एकी झाली नव्हती. यावरून त्यावेळच्या क्षत्रियांच्या अंगीं कर्तृत्व नव्हतें असें नाहीं, परंतु त्यांना एकीचें महत्व पटलें नव्हतें. क्षुल्लक स्वार्थामुळें व मानापमानामुळें ते खऱ्या कर्तव्यापासून पराङ्मुख होत होते. त्यावेळची ही एकंदर भारताची विस्कळितावस्था पाहून मध्य आशियांतील महापराक्रमी वीर शिकंदर भारत जिंकण्याच्या उद्देशानें आला. त्यापूर्वीं त्यानें अनेक देश जिंकून आपलें सामर्थ्य खूब वाढविलें होतें. त्यामुळें त्याला आपसांतील कलहामुळें खिळखिळें झालेलें हिंदुस्थान जिंकणें फारसें जड नव्हतें आणि त्याच विचारानें त्यानें मोठ्या उत्साहानें सिंधु नदी ओलांडली. कित्येक स्वातंत्र्यवीरांनीं शिकंदराला अडथळा केला, पण दिव्यावर झडप घालणाऱ्या पतंगाप्रमाणेंच त्यांची अवस्था झाली. ती वेळ भारताच्या इष्टानिष्ट भवितव्यतेची होती. महान शिकंदराच्या आक्रमणानें सर्व

देश जागृत झाला. पण त्यांच्यांत एकी नव्हती, किंवा त्यांच्या एकीचें नेतृत्व स्वीकारून शिकंदरांशीं सामना करण्याचें धैर्य कोणांतही नव्हतें. त्यामुळें शिकंदर हळू हळू पंजाबांत शिरूं लागला. पण भारताचें स्वातंत्र्य इतक्यांतच नष्ट व्हावयाचें नव्हतें. शिकंदराचें सैन्य पुढें जाण्यास माघार खाऊं लागल्यामुळें त्याला नाइलाजास्तव तेथूनच परत फिरावे लागलें.

याच सुमारास उत्तर हिंदुस्थानांत भारताच्या उज्ज्वल यशाची, चिरस्वातंत्र्याची घटना घडविली जात होती. चाणक्य नांवाचा कोणी हुषार व राजकारणी पुरुष मगधराजाच्या नाशाकरितां धडपडत होता. नंदराजानें चाणक्याचा अपमान केल्यामुळें त्याचा नाश करण्याची घोर प्रतिज्ञा चाणक्यानें केली होती. आणि तेवढ्याच करितां त्यानें अनेक राज्यें धुंडाळून शेवटीं आपली प्रतिज्ञा पूर्ण करण्यसारखा क्षात्रवीर चंद्रगुप्त हाताशीं धरिला. चंद्रगुप्तालाही आपल्या पित्याचें गेलेलें राज्य मिळविण्याची इच्छा होतीच ! आणि त्याच्या जबर महत्त्वाकांक्षेला अशा रीतीनें प्रोत्साहन देणारा चाणक्य मिळाल्यामुळें त्याला जास्तच अवसान आलें. चंद्रगुप्तानें चाणक्याच्या सल्ल्याप्रमाणें थोडें थोडें सैन्य जमवून एकदोन लहान राज्येंही जिंकून घेतलीं. याच सुमारास शिकंदर येऊन गेल्यामुळें राष्ट्रांत एकच खळबळ माजून राहिली होती. आणि ती भारताची एकी कशी होईल या संबधींच ! ही संधी चंद्रगुप्तालाअमूल्य वाटली. व त्यानें सर्वांच्या एकीचें नेतृत्व स्वीकार-

ण्याचें मोठें धाडस केलें. परकीयांच्या हल्ल्यापासून आपला देश बचावण्याचा उद्देश ज्यांना पसंत पडला अशा अनेक राजांनीं चंद्रगुप्तास साह्य केलें. परंतु चंद्रगुप्ताचा हा वाढता उत्कर्ष पाहून कित्येकांना हेवा वाटूं लागला. ज्याला स्वतःचें मुळीं राज्यच नाहीं, ज्याच्या कुलगोत्राचाही पत्ता नाहीं अशा एकाद्याला आपला पुढारी ह्मणण्यास त्यांना अपमान वाटूं लागला व कित्येकांनीं या बाबतींत चंद्रगुप्ताला उघड विरोधही केला. पण तो द्वितीयेचा चंद्र अशा विरोधाला न जुमानता कलाकलांनीं वाढूं लागला. आणि वयाच्या अवघ्या चोविसाव्या वर्षींच त्यानें राष्ट्राचें नेतृत्व पत्करलें.

हिंदुस्तानांतून परत गेल्यानंतर लवकरच इ. स. पूर्वी ३२३ त शिकंदर बाबिलोनमध्यें मृत्यु पावला. त्याचवेळीं तिकडे सेल्यूकस नांवाच्या दुसऱ्या एका महत्त्वाकांक्षी वीरानें शिकंदरानें जिंकलेलें अनेक देश जिंकून हिंदुस्तानावर चाल केली. हिंदुस्तानांत काय स्थिति आहे हें त्याला माहीत होतें त्यामुळें त्यानें शिकंदराच्या मार्गानेंच आक्रमण केलें. व शिकंदरानें जिकलेलेच प्रांत घेतले. यावेळीं चंद्रगुप्ताकडे सर्वांचे नेत्र लागले होते. ही अत्यंत अणिबाणीची वेळ होती. विश्व-विजयी सेल्यूकस मोठ्या तयारीनें आला असल्यामुळें तो तसाच परत जाणार नव्हता. पण चंद्रगुप्तानें युद्धभूमीवर सेल्यूकसाला पहिली सलामी दिली. आणि काळरांहूंनीं ग्रासिलेला भारताचा स्वातंत्र्यसूर्य प्रकाशित केला. सेल्यूक-

साला हार खावी लागली, त्यानें तह करून चंद्रगुप्ताशीं कायम स्नेह राहण्याकरितां आपली मुलगी त्याला अर्पण केली. व मेग्यास्थिनीस नांवाचा मोठा हुशार वकील चंद्रगुप्ताच्या दरबारांत ठेऊन तो परत आपल्या देशास गेला. या अपूर्व विजयानें चंद्रगुप्तानें आपलें सामर्थ्य तर वाढविलेंच पण भारतावर आलेलें महासंकट दूर करून त्याचें स्वातंत्र्य कायम राखिलें. या युद्धांत चंद्रगुप्तानें परकीयांना जो धाक बसविला त्यामुळें सुमारें दीडहजार वर्षेपर्यंत कोणाही परकीयाला भारतांत पाऊल टाकण्याचें धैर्य झालें नाहीं.

नंदराजाचा पराभव करून मगधाचें राज्य मिळविल्यामुळें चाणक्याची प्रतिज्ञा पूर्ण झाली. आणि सेल्यूकसाचा पराभव करून चंद्रगुप्त पहिला भारतसम्राट झाला. या विजयानंतर चंद्रगुप्ताचें सामर्थ्य वाढल्यामुळें त्याला विरोध न करतां हजारो राजे लोकांनीं त्याचें सार्वभौमत्व कबूल केलें. व दक्षिणेंतील चोल, पांड्य राजाकडूनही त्याला नजराणे मिळाले. चंद्रगुप्तानें इ. स. पूर्वी ३२६ ते ३०२ पर्यंत सुमारें चोवीस वर्षे राज्य केलें. तो जसा पराक्रमी होता तसाच अत्यंत धार्मिक व नीतिमानही होता. त्याच्या राज्यव्यवस्थेंतील गोष्टींचें सुंदर वर्णन मेग्यास्थिनीस यानें लिहून ठेविलें आहे. त्यावरून पहातां पुढील गोष्टी चंद्रगुप्ताच्या कीर्तींत अधिकच भर घालतात असें दिसेल.

१ चंद्रगुप्तानें शेतकी खातें स्वतंत्र करून शेतकऱ्यांच्या

सुखसोयीची शक्य तितकी काळजी घेतली होती. देशांत प्रत्यक्ष युद्ध चाललें असलें तरी शेतकरी आनंदानें नांदत असत.

२ राज्यांत कोणत्याही प्रकारें अन्याय होऊं नये ह्मणून त्यानें गुप्त हेर ठेविले होते. ते सर्व देशभर फिरून राजाला खडान्खडा बातमी देत. त्यांत ज्यांचे अन्यायवर्तन दिसेल त्यांना जबर शिक्षा होई.

३ देशांतील कारखाने व उद्योग धंदे याला फारच मदत मिळे व त्यांच्या संरक्षणासाठीं एक स्वतंत्र खातें होतें.

४ राजधानी पाटलीपुत्र होती. शहरसुधारणेसाठीं आजच्या म्यु० पालिटीप्रमाणें एक खातें होतें. व त्याकडून शहराची व्यवस्था उत्तम प्रकारें राखिली जाई.

५ शेती करितां पाट बंधारे व धरण बांधून पाणी पुरवठ्याची सोय केली होती.

६ जनन मरणाची नोंद ठेविली होती.

७ परदेशाशीं मोठा व्यापार असल्यामुळें परकीयांची बरीच वसती होती. त्या लोकांच्या सुखसोईकडे पूर्ण लक्ष पुरविलें जाई. व त्यासाठीं एक स्वतंत्र खातें होतें.

८ चोरी वगैरे गुन्हे करणाऱ्यांना अत्यंत कडक शिक्षा दिली जाई त्यामुळें गुन्ह्याचें प्रमाण इतकें कमीं होतें कीं कधीं १२५ रु. पेक्षां जास्त चोरी झाली नाहीं.

९ अनाथाकरितां पुष्कळ दानधर्म होत असे.

१० यात्रेकरूंचें व सैन्याचें दणवळण जिकडे जास्त होतें असे मार्ग पक्क्या खडीचें केलेले होते.

११ त्याच्या राज्यांत सर्व भरतखण्ड व अफगाणिस्तान, बलुचिस्तान वगैरे प्रांतांचाही समावेश होता. या सर्व अफाट राज्याची व्यवस्था चांगली राखण्यासाठीं निरनिराळे प्रांत करून अधिकारी नेमिले होते.

१२ ठिकठिकाणीं दवाखाने व शिक्षण संस्था, होत्या.

१३ डाक व्यवस्था ही केली होती.

वरीलप्रमाणें राज्यव्यवस्था आजच्या सुधारलेल्या राज्यांतही दिसत नाहीं, हें आपण पाहातोंच ! अडीच हजार वर्षांपूर्वीं एका भारतवासीयानें अशा प्रकारची राज्यव्यवस्था केली होती हें पाहून पाश्च्यात्यांनाही अचंबा वाटत असल्यास नवल नाहीं !

मेग्यास्थिनीस लिहितो कीं चंद्रगुप्ताची आपल्या गुरूवर (यतीवर) फार भक्ती असे. कोणतीही गोष्ट त्यांच्या सल्ल्यानेंच तो करीत असे. चंद्रगुप्ताचे ह्या वेळचें गुरु श्री भद्रबाहु आचार्य होते. त्यांचा शिष्यपरिवार फार मोठा होता. इ. स. पूर्वीं ३०० च्या सुमारास उत्तर हिंदुस्तानांत मोठा दुष्काळ पडला होता. त्यावेळीं आपला शिष्यसंघ घेऊन आचार्यांनीं दक्षिणहिंदुस्तानांत प्रयाण केलें. चंद्रगुप्तही त्यावेळीं आपल्या गुरूबरोबर दक्षिणेंत आला. बालपणीं अनेक प्रकारचीं संकटें भोगून अवघ्या चोविसाव्या वर्षींच त्यानें

मगधाचें राज्य मिळवून सर्व भरतखंड पादाक्रांत केला. आणि चोवीस वर्षेपर्यंत प्रजेचें पुत्रवत् पालन करून जिनदीक्षा धारण केली. त्याच्यामागें त्याचा मुलगा बिंदुसार हा गादीवर बसला.

चंद्रगुप्ताच्या कुलासंबंधीं व जैनत्वासंबंधीं आजपर्यंत कित्येकांनीं विपरीत मतें प्रतिपादिलीं होतीं, परंतु पाश्चात्य संशोधकांनीं पूर्ण शोधाअंतीं त्या दोन्ही गोष्टीसंबंधीं जैनग्रंथाप्रमाणेंच उल्लेख केला आहे.

चंद्रगुप्त हा मुरा नांवाच्या दासीचा पुत्र होता ह्मणून त्याला मौर्य ह्मणत असत, असा कित्येकांनीं उल्लेख केला आहे परंतु हिमालयाच्या पायथ्याशीं मयूर नांवाचा प्रांत असून तेथील तो राजपुत्र होता, ह्मणून त्याला मौर्य ह्मणत. त्या मयूर प्रांतांत गौतमबुद्ध गेले होते असाही उल्लेख आहे.

दुसरें, चंद्रगुप्ताच्या जैनत्वासंबंधीं कित्येकांना शंका वाटत होती व तो बौद्ध असावा असा कांहींचा समज होता परंतु चंद्रगुप्त भद्रबाहु आचार्यांबरोबर दक्षिणेंत आला होता. व श्रवणबेलगोला येथें (म्हैसूर प्रातांत) त्यासंबंधीं पुष्कळ शिलालेखही आहेत. चंद्रनगर नांवाचें त्याच्या नांवानें वसलेलें शहर अद्यापही तेथें आहे. त्या सर्व शिलालेखांचा तपास करून मि० रईस साहेब यांनीं चंद्रगुप्त निःसंशय जैन होता असें सिद्ध केलें आहे. त्यानंतर सर्व पाश्चात्य इतिहासकारांनी आपलें पूर्वींचें मत चुकीचें असल्याचें

कबूल केलें. (यासंबंधीं जास्त माहिती ' सम्राट चंद्रगुप्त ' या पुस्तकांत विस्तारानें लिहिलीं आहे ती पहावी.)

आचार्य भद्रबाहूंच्या मागें सर्व मुनिसंघाची जबाबदारी चंद्रगुप्तावर पडली. म्हैसूर प्रांतांतील श्रवणबेळगोळा येथील निसर्गसुंदर पहाडावर कित्येक वर्षे तप केल्यानंतर या राजर्षीनें समाधिमरण घेतलें.

आचार्य भद्रबाहु व सम्राट चंद्रगुप्त यांच्याविषयीं जैनग्रंथांतून अत्यंत आदरानें उल्लेख केलेला दिसून येतो. व अजूनही श्रवणबेलगोळा येथें भद्रबाहू गुफा, आणि चंद्रगुप्ताचें समाधि स्थल जैन यात्रेकरू मोठ्या आदरानें पाहून येतात.

जैनांचा अहिंसाधर्म युद्ध करण्याला किंवा राष्ट्ररक्षण करण्याला प्रतिबंध करीत नसून तो मोठमोठे चक्रवर्ती उत्पन्न करतो; हें आज पुष्कळांना पटत आहे. वाचकहो, सम्राट्-चंद्रगुप्ताचा पराक्रम आणि अलौकिक त्याग ही अनुकरणीय नाहींत कां ? परकीयांच्या ताब्यांत जाणारा भारतवर्ष प्रथमतः चंद्रगुप्तानेंच सावरून धरला असून शेकडो वर्षेपर्यंत येथें नांदणाऱ्या स्वातंत्र्याचें श्रेय त्या अहिंसाधर्मावलंबी चंद्रगुप्ताकडेच आहे. भारताचा स्वातंत्र्येतिहास लिहितांना पहिल्या पानावरच ' सम्राट चंद्रगुप्त ' हें नांव सुवर्णाक्षरांनीं लिहिलेलें वाचण्यांत कोणाही भारतवासियांना अभिमान वाटल्याशिवाय राहाणार नाहीं.

---

४ सम्राट बिन्दुसार.

चंद्रगुप्तानंतर इ. स. पूर्वी ३०० च्या सुमारांस त्याचा मुलगा बिंदुसार हा मौर्यवंशांतील दुसरा राजा गादीवर बसला. याची जरी विशेषतः प्रसिद्धी नसली तरी, चंद्रगुप्तानें मिळविलेल्या अफाट साम्राज्याचा तो धनी होता. व त्यानेंही पित्याप्रमाणेंच प्रजेचें उत्तम तऱ्हेनें पालन केलें होतें.

जगांत अशी ह्मण आहे कीं, संपत्ती, यश, कीर्ति, ही मिळविणें जितकें कठिण आहे, तितकेंच त्यांचें पालन करणें ही कठिण आहे. राजर्षि चंद्रगुप्तानें स्वतःच्या पराक्रमानें जरी सम्राट्त्व प्राप्त करून घेतलें तरी बिंदुसारानें तें कायम टिकविण्याचें महत्कार्य केलें. चंद्रगुप्तासारख्या एका निःसहाय राजपुत्रानें मगधाचें राज्य बळकावलें, आणि सर्व भरतखंडावर आपली सत्ता प्रस्थापित केली, हें इतर स्वाभिमानी राजांना आवडणें शक्य नव्हतें. जरी त्यांनीं नाइलाजास्तव त्याची सत्ता शिरसावंद्य मानली होती तरी मनांतून ते त्याचा हेवा करीत होते. आणि निदान चंद्रागुप्तानंतर तरी आपणांला पूर्ववत पुन्हां स्वतंत्र होतां येईल अशी त्यांची समजूत होती. परंतु सम्राट चंद्रगुप्तानें जर जुलमी कारभार केला असता तर कदाचित् तसें झालें ही असतें. परंतु त्याच्या सौजन्यामुळें, प्रजाप्रेमी वर्तनामुळें, व दक्षतेमुळें इतरांचा हा अभिमान व्यर्थ झाला. चंद्रगुप्ताच्या मृत्यूनंतर कित्येक राजांनीं डोकें उचलण्याचा प्रयत्न केला, परंतु सम्राट

बिंदुसारानें पित्याच्या शासनपद्धतींत कोणत्याही प्रकारें न्यूनता पडूं न देतां, लोकप्रीति संपादून आपली सत्ता कायम राखिली. चंद्रगुप्ताच्यावेळीं ज्याप्रकारें राज्यव्यवस्था होती त्याचप्रमाणें त्यानें मोठ्या चातुर्यानें राज्य केलें.

याच्या राज्यकालांत विदेशी लोकांशीं हिंदुस्तानचा जास्तच संबंध वाढून व्यापाराची भरभराट झाली. परदेशीय लोकांना अनेक सवलती देऊन व आपल्या देशांतील कारखानदारांना उत्तेजन देऊन त्यांचें चांगल्या प्रकारें रक्षण केलें.

सेल्यूकसाचा वकील मेग्यास्थिनीस हा निघून आपल्या देशीं जातांच, सेल्यूकसाचा मुलगा एंटिओकस यानें दुसरा नवीन दूत बिंदुसाराकडे पाठविला होता. व त्याचप्रमाणें मिसरनरेश होल्मीफो डोल्फ यानें ही आपले कांहीं दूत सम्राट् बिंदुसाराकडे पाठवून त्याची प्रीति संपादन केली होती. यावरून सम्राट चंद्रगुप्ताप्रमाणें हाही पराक्रमी व न्यायी राजा होऊन गेला असें दिसून येतें.

बिंदुसार हाही पित्याप्रमाणें धर्मप्रेमी व न्यायप्रेमी होता त्यानें दक्षिणेंत जाऊन श्रवणबेळगोळा येथें पित्याचें स्मारक बांधिलें. व सर्वत्र जैनधर्माचा प्रसार केला. याची सुभद्रांगी नांवाची एक ब्राह्मण जातीची राणी होती, व तिच्या पोटींच अशोक राजाचा जन्म झाला होता. अशोकाहून दुसरा एक वडील मुलगा होता, परंतु अशोकाचें चातुर्य व जिनधर्मप्रेम पाहून बिंदुसारानें त्यालाच युवराजपद दिलें.

एकंदरींत पहातां सम्राट् चंद्रगुप्त व सम्राट् अशोक यांच्या

कारकीर्दीतला हा दुआ अत्यंत श्रेष्ठप्रतीचा होता. म्हणूनच त्याला पित्याच्या साम्राज्याचें चांगल्याप्रकारें रक्षण करतां येऊन अशोकासारख्या दुसऱ्या सम्राटाची उत्पत्ति करतां आली.

५ सम्राट् अशोक.

सम्राट बिंदुसारानंतर त्याचा मुलगा अशोक हा मगध सिंहासनावर विराजमान झाला. इ. सनापूर्वी २७३ व्या वर्षी त्याचा राज्याभिषेक झाला. त्यापूर्वी तो राज्याच्या पश्चिमेकडील एका विभागावर सुभेदार ह्मणून काम पहात होता व त्या प्रांताची व्यवस्था त्यानें फारच उत्तम प्रकारें ठेविली होती. पश्चिम भागांत त्यावेळीं तक्षशिला येथें एक विश्वविद्यालय होतें. व उज्जयिनी येथेंही अनेक प्रकारच्या शिक्षण-संस्था होत्या. ज्योतिष व गणित विषयावर ग्रंथ रचणारे मोठमोठे जैन पंडित तेथें होते.ह्मणूनच उज्जयिनीला हिंदुस्थानांतील ग्रीनीचचें स्थान प्राप्त झालें. या सर्व संस्थांची योग्य तऱ्हेनें अशोकानें व्यवस्था ठेविली होती.

अशोकाचा राज्याभिषेक झाल्यानंतर त्याला आपल्या वीर पूर्वजाप्रमाणेंच राज्यविस्तार करण्याची इच्छा उत्पन्न झाली. व त्यानें पहिली स्वारी कालिंग देशावर केली. हा देश महानदी व गोदावरी यांच्या मधल्या प्रदेशांत होता. तेथील लोकांनीं अद्यापि मौर्यांच्या हातीं आपलें स्वातंत्र्य दिलें नव्हतें. कालिंगचें सामर्थ्य जरी अशोकाच्या मानानें लहान होतें तरी त्याची स्वातंत्र्यप्रीति फार मोठी होती, व तें स्वातंत्र्य कायम राखण्याकरितां त्यांनीं आपल्या प्राणांचें बलिदान

करून अशोकाशीं घनघोर युद्ध केलें. आणि शेवटीं अशोकाचा जय झाला. या युद्धांत इतकी भीषण हत्त्या झाली कीं, ती पाहून अशोकाचें हृदय दुभंगून गेलें. त्यानें त्याचक्षणीं प्रतिज्ञा केली कीं, यापुढें कधींही युद्ध म्हणून करायचें नाहीं. इतकेंच काय पण आपलें सर्व आयुष्य धर्मकार्यांतच खर्च करावयाचें असाही त्यानें संकल्प केला. आणि त्यानें आपल्या वंशजाकरितांही असेंच लिहून ठेविलें कीं — ' राज्यलोलुपी होऊन युद्ध करूं नका, धर्मविजय हाच खरा विजय आहे. ' याप्रमाणें कलिंगयुद्धानें अशोकाच्या हृदयांतील राज्यलालसा कमीं करून धर्मप्रेमाची जागृती करून दिली.

अशोकानें आपल्या आयुष्यांत पहिली आणि शेवटची अशी एकच लढाई केली आणि ती कलिंगचीच! तरी पण त्याच्या साम्राज्यांत अफगाणिस्तान, बलुचिस्तान वगैरे प्रांत होतेच! बंगाल प्रांत पूर्वींच त्याच्या ताब्यांत होता व कलिंग आणि आंध्र हेही प्रांत त्याच्या आधीन झाले होते. दक्षिणेंत नेलोरपासून पश्चिम किनाऱ्यापर्यंत त्याची सत्ता होती. व केरल, तामील व पांड्य या दोन तीन राज्या खेरीज बहुतेक सर्व भारतावर त्याची सत्ता प्रस्थापित झाली होती. यानें काश्मिरांत ' श्रीनगर ' व नेपाळांत ' ललितपट्टन ' या दोन नवीन राजधान्या वसविल्या. इतक्या मोठ्या साम्राज्याची व्यवस्था चांगल्या प्रकारें व्हावी म्हणून त्यानें निरनिराळे भाग करून मुख्य मध्यवर्ति भाग सोडून बाकी-

च्या चार भागावर राजप्रतिनिधि नेमिले होते. तक्षशिला उज्जयिनी व तोषाली येथें तीन प्रतिनिधि रहात असत व एक प्रतिनिधि दक्षिण प्रांतावर होता.

अशोकाच्या राज्यशासनांत मुख्य स्थान धर्माला होतें, केवळ राज्यकार्य व देशांत शांतता राखणें येवढेंच तो पहात नसून धर्मप्रसार करण्याचें मुख्य ध्येय असल्यामुळें अशोकाचें राज्यशासन निराळ्या स्वरूपाचें झालें होतें. त्यानें नेमलेले धर्माधिकारी सर्व राज्यांत दौरा काढून लोकांना त्यांचें धर्मकर्तव्य समजावून देत. वर्षांतून असे कांहीं ठराविक दिवस असत कीं त्यावेळीं राज्यांतील प्रत्येक अधिकाऱ्यानें आपलें काम सांभाळून धर्मप्रसाराचें ही काम केलें पाहिजे. लोक आपल्या मातापित्याचा आदर करतात कीं नाहीं-हिंसेचा प्रघात बंद झाला आहे किंवा नाहीं ? स्त्रियांची वागणूक कशा प्रकारची आहे ? कोठें यज्ञांत पशुवध होतो. काय, वगैरे गोष्टीवर देखरेख करण्याचें काम त्या अधिकाऱ्यांकडे असे.

अशोक हा अत्यंत दयाळू, राजनीतीज्ञ, धर्मात्मा, व प्रजापालक असा राजा होता. प्रत्येक प्राण्याचें जीवन कसें सफल होईल; त्याला परभवसुखाकरितां जास्ती पुण्यसंचय कसा करतां येईल; या विषयीं तो सर्वदा विचार करीत असे. प्रजेच्या सुखांतच आपलें सुख मानणारा तो एक पुण्यात्मा राजा असल्यामुळें त्याची प्रजा अत्यंत सुखी होती. त्याच्या तुरुंगांत फारच थोडे कैदी होते. व प्रतिवर्षी वाढ-

दिवसाच्या उत्सवप्रसंगीं तो एक कैदी सोडून देत असे. अशोकाच्या एकंदर जीवनचरित्रा वरून व त्याच्या धर्मप्रसाराच्या तत्वावरून तो जैनधर्माप्रमाणेंच वागत होता असें पुष्कळ इतिहासज्ञाचें मत आहे. त्याचा पिता बिंदुसार व आजा चंद्रगुप्त हे दोघे जैन होते आणि त्याप्रमाणें अशोकाचें प्रारंभीचें जीवनही जैनधर्माप्रमाणें व्यतीत झालें आहे. परंतु मध्यंतरीं त्यानें बौद्धधर्म स्वीकारला होता. असेंही पुष्कळ इतिहासकारांचें ह्मणणें आहे.

कित्येक प्रसंगांवरून त्याचें वर्तन बौद्धधर्मास विरोधी होतें असें दिसून आल्यामुळें कांहीं इतिहासकार त्याला हिंदुधर्मी समजतात. परंतु अशोकाच्या मनावर बालपणीं बिंबलेल्या जैन धर्माचाच परिणाम होऊन त्याच्या हातून त्याच स्वरूपाचा धर्मप्रसार झाला आहे असें आज पुष्कळांचें मत बनत चाललें आहे. कित्येकांनीं असें ह्मटलें आहे कीं, अशोक हा पूर्वी मांसभक्षण करीत असे, परंतु तें सर्वथा खोटें आहे कारण अशोक हा जन्मतः जैन होता व कलिंग युद्धांत त्याच्या मनावर जो परिणाम झाला तो त्यामुळेंच होय ! तो जर मांसभक्षण करीत असतां तर त्याच्या हृदयावर तसा कधींहीं परिणाम झाला नसतां !

राजावलीकथा व परिशिष्टपर्व या दोन ग्रंथावरून असें आढळून येतें कीं, अशोक हा आपल्या पितामहाच्या समाधीच्या दर्शनासाठीं श्रवणबेळगोळा येथें गेला होता. व तेथें

त्यानें चंद्रवस्ती नांवाचें जिनमंदिर बांधिलें आहे. एकंदरीत पहातां अशोकानें मध्यंतरीं थोडे दिवस बौद्धधर्म स्वीकारला असावा असें दिसतें. मात्र त्यानें जो धर्मप्रसार केला तो जैनधर्माचाच होता असा अनेक पाश्चात्त्य विद्वानांनीं शोध लावला आहे. [प्रो० कर्न, मि. टॉमस, मि. राईस, पंडित नागेंद्रनाथ बसु, वगैरे विद्वान इतिहासकार अजैन आहेत, परंतु त्यांनीं अनेक जैन शिलालेखाधारें अशोक हा निःसंशय जैन होता असें सिद्ध केलें आहे. राजतरंगिणी या ग्रंथांत व ऐनेअकबरीमध्येंही त्याच्या जैनत्वाचाच स्पष्ट उल्लेख केला आहे. यासंबंधीं जास्त माहिती, श्रीमान् कामताप्रसादजी यांच्या इतिहास पुस्तकांत पहावी.]

आपल्या देशांतील बहुतेक इतिहासकारांनीं जैनधर्माचा अभ्यास केला नसल्यामुळें त्यांना जैन व बौद्ध धर्मांतील अंतर कळल्यामुळें, कोणताही शिलालेख, ग्रंथ, मूर्ति किंवा कोणतेंही ऐतिहासिक प्रमाण मिळतांच त्याला बेधडक 'बौद्धांचें' ह्मणून समजावें असा जणूं प्रघातच पडला. त्यामुळें खरें तें बाजूला राहून विपरीत मत प्रतिपादिलें गेलें आहे. हिंदुस्तानांतील बहुतेक कोरीव लेण्या जैन राजांनींच कोरल्या आहेत. मूर्तिपूजा ही जैनांचीच असल्यामुळें सुमारें इ. स. पूर्वी पांच हजार वर्षापर्यंतच्या जैनांच्या मूर्ति सांपडतात, पण त्या सर्वांचा बौद्ध ह्मणून उल्लेख केला जातो. ही चुकीची दृष्टि असल्यामुळेंच अशोकासंबंधींही असें लिहिलें जाणें शक्य आहे. असो.

अशोकानें आपल्या साम्राज्यांतर्गत सर्व प्रांतांत व इतर अनेक देशांतही धर्मप्रसार केला. त्याच्या प्रचारकांना 'धर्म-महामात्र' व 'धर्मयुक्त' अशा पदव्या होत्या. त्यापैकीं पहिली पदवी अत्यंत मानाची समजली जात असे. अशोकाचे हे धर्मप्रचारक, आशियांतील अनेक देश, आफ्रिका व युरोपांतही गेले होते. व त्या त्या ठिकाणीं अद्यापि कांहीं ऐतिहासिक आधार मिळतात.

अशोकानंतरचा राज्याधिकारी सम्राट संप्रति हा होता व त्यानें दूरदूरच्या देशांत जैनमुनि धर्मप्रसारासाठीं पाठविले होते हें प्रसिद्ध आहे. जर अशोक जैन नसता व त्यानें जैन धर्माचा दूरवर प्रसार केला नसतां, तर संप्रतीला तिकडे मुनिलोकांना पाठविणें अशक्य झालें असतें. अशोकानें जो हा अहिंसा धर्माच्या प्रचाराचा महत्प्रयास केला व जगभर आपले दूत पाठविले. सामान्य कार्य नव्हतें. ह्मणूनच त्यानें धर्मविजय महत्वाचा मानला आहे !'

अशोकाच्या राज्यशासनासंबंधीं व धर्मप्रसारासंबंधीं जे नियम होते ते त्यानें मोठमोठ्या शिलेवर कोरून ठेविले आहेत. हिंदुस्तानांतील सर्वांत जुने शिलालेख चंद्रगुप्ताच्या वेळचे आहेत व त्यानंतरचे अशोकाचे आहेत. त्या शिलालेखावरून असें आढळून येतें कीं— "त्यावेळीं पाश्चात्य लोकसुद्धां भारतवासियांचा उपदेश ऐकत असत !

त्याच्या कारकीर्दींत धर्मप्रसाराप्रमाणेंच शिल्पकलेचीही

उन्नति झाली होती. त्यावेळीं कोरलेल्या लेखाप्रमाणें सुंदर काम आज कोठेंही पहावयाला मिळत नाहीं !

अशोकानें एकंदर चाळीस वर्षेंपर्यंत राज्य केलें. व इ. सनापूर्वी सुमारें २३६ व्या वर्षी त्या महात्म्याचा अंत झाला. त्यानें आपल्या वृद्धावस्थेंत आपला राज्यभार संप्रतीवर सोंपवून अंतिमकाल धर्मकार्यांत घालविला असें कित्येकांचें ह्मणणें आहे. अशोकाला कुणाल नांवाचा मुलगा होता, परंतु त्यानें फार दिवस राज्य केलें नाहीं, कुणालाचा भाऊ दशरथ हा राज्यकारभार पांहूं लागला. त्यानंतर नातू संप्रति हा राज्याधिकारी झाला. अशोकाच्या हयातींतच संप्रतीकडे पश्चिम प्रांताची सुभेदारी होती असें दिसून येतें.

अशोकानंतर संप्रति हा एक प्रसिद्ध राजा झाला, त्यानंतर लवकरच मौर्यसम्राज्याचा अंत झाला. अहिंसाधर्माचा प्रसार करणारा धर्मात्मा अशोक अत्यंत श्रेष्ठ प्रतीचा राजा होऊन गेला. त्याचें धर्मप्रसाराकडे जितकें लक्ष होतें तितकेंच राज्यरक्षणाकडे हि होतें ह्मणूनच त्याची प्रजा सुखी व सद्गुणी राहिली. आणि तिच्या हातून अनेक ललितकला उत्पन्न झाल्या.

धर्मात्मा अशोकानें धर्मप्रसाराला जास्त महत्व देऊन राज्यशकट हांकल्यामुळें त्याला यश व कीर्ति या दोहोंचा लाभ होऊन स्वतःच्या आत्मोद्धाराबरोबर जगाचेंही कल्याण करतां आलें.

———

६ महामेघवाहन सम्राट् खारवेल

महापराक्रमी मौर्य सम्राटांसारख्या साम्राज्याधिकाऱ्या-शीं स्पर्धा करून ज्यांनीं आपलें नांव स्वातंत्र्यरक्षक म्हणून जगतीतलावर अजरामर केलें त्या कलिंग राजवंशांत सम्राट् खारवेल याचा जन्म झाला आणि यानेंच शेवटच्या मौर्य राजास जिंकून सम्राट्पद मिळविलें.

इ. सनापूर्वी कलिंग देश स्वतंत्र होता व तें स्वातंत्र्य अखंड राखण्यासाठीं कलिंगवासियांनीं आपल्या देशाला रक्तांनीं नाहूं घातलें होतें. नंदराजाच्या वेळीं कलिंगची राजधानी 'तोषाली' होती (हल्लीं तेंच शहर 'धऊली' नांवा-नें प्रसिद्ध आहे, असें विद्वानांचें मत आहे,) तेथें 'ऐर्य' वंशीय जैन राजे राज्य करीत होते. व त्यांना महामेघवाहन ही उपाधि होती. बहुधा ते वैदिकांशीं विरोध करीत असत. अशोकानें जेव्हां कलिंग देश जिंकिला तेव्हांच तेथें बौद्ध धर्माचा शिरकाव झाला. तोपर्यंत तेथें जैनधर्मी राजे व प्रजा होती हें सिद्ध होतें. इ. सनापूर्वी १५९ वर्षी अशोकानें कलिं-गावर स्वारी केली. चंद्रगुप्तानें जरी भारत वर्ष आपल्या अंमलाखालीं आणला होता, तरी कलिंग व उत्कल या दोन देशांचें स्वातंत्र्य मात्र कायम होतें. त्या दोन्हीं देशांतील जैन धर्माचें उन्नत वैभव बौद्धधर्मप्रेमी अशोकाला पाहवलें नाहीं, आणि त्यानें मोठ्या तयारीनें ही स्वारी केली. शेवटीं अशोकानें विजयलक्ष्मी मिळविली, परंतु या युद्धांत कलिंग

वासियांनीं जें साहस, शौर्य, आणि देशप्रेम व्यक्त करून आत्माहुति केली, तें पाहून प्रत्यक्ष अशोकाच्या मनांतही दयेचा पाझर फुटला. आणि त्यावेळेपासून त्यानें कधींही युद्ध न करण्याची प्रतिज्ञा केली. अशोकानें लिहून ठेविलें आहे कीं--

"कालिंग युद्धांत त्या देशांतील सैन्यापैकीं एक लाख पन्नास हजारहून जास्त जखमी व असंख्य लोक समरांगणांत मृत्यु पावले"

समरांगणांतील शवांचे पर्वतप्राय ढीग, रक्ताचे पाट आणि हजारो जखमी लोकांचें विव्हळणें पाहून अशोकाच्या आयुष्याचें परिवर्तन झालें. आपल्या देशाच्या-संरक्षणासाठीं कलिंगसैन्यानें आपल्या प्राणांची आहुति देऊन जें देशप्रेम दाखविलें तें केवळ भारतांतच नव्हें पण अखिल जगांतही सुवर्णाक्षरांनीं नोंदलें आहे!

पण अभागी कालिंग सर्वस्वाची आहुति देऊनही आपलें स्वातंत्र्य राखूं शकला नाहीं. अशोकाच्या साम्राज्यांत कलिंगाचा समावेश झाला. परंतु 'ऐर' राजांनीं अशोकाचे सार्वभौमत्व मान्य केलें नाहीं. राज्यत्याग करून ते कोशल देशांत स्वतंत्रतेनें राहूं लागले. पुढें अशोकाच्या मृत्यूनंतर ४६ वर्षांनंतर ऐर राजा 'चैत्र' यानें मौर्यांची बलहीनता पाहून कोशलहून जाऊन कलिंग परत घेतलें.

चैत्र राजानें परत कलिंग घेतल्यानंतर त्यापुढील राजांना

चैत्रवंशीय जैन असें संबोधूं लागले. या चैत्रवंशांत एकंदर नऊ राजे झाले. व ते सर्व जैनधर्मीच होते. आणि त्यांना महामेघवाहन ही बहुमानाची पदवी होती. या चैत्र वंशांतच महापराक्रमी ' खारवेलाचा जन्म झाला. सुमारे सोळा-वर्षांपर्यंत त्याला अनेक प्रकारचें शिक्षण देऊन निपुण केल्यानंतर त्याला युवराजपद दिलें. आणि त्यानंतर पुढें आठ वर्षांनीं त्याचा राज्याभिषेक झाला. शिलालेखावरून असें आढळून येतें कीं त्यानें प्राची नदीच्या तीरीं एक सुंदर भवन बांधलें होतें.

राज्याधिकार प्राप्त झाल्यानंतर दुसऱ्याच वर्षी खारवेलानें दिग्विजयास सुरवात केली. इ. सनापूर्वी सुमारें २१० व्या वर्षी प्रतिष्ठाण (हल्लीचें पैठण) येथें राज्य करणाऱ्या ब्राह्मण वंशीय सातकर्णी नांवाच्या राजास त्यानें जिंकिलें. नंतर मूषिक प्रांत जिंकला. (मूषिक राज्य विंध्याचलानजीक पैठण आणि गोंडवन यांच्या मध्यें असावें)

सातकर्णी आणि मूषिक यांच्यावर विजय मिळवून खारवेलानें आपलें सैन्य पश्चिमेस वळविलें. तेव्हां राष्ट्रिक [हल्लीच्या महाराष्ट्रांतील राजे] व भोजक (वऱ्हाडचे राजे) हे त्याला शरण आले. त्यावेळीं वऱ्हाडांत कोणी राजा नसल्यामुळें खारवेलानें तो प्रांत ताब्यांत घेऊन तेथील अलोट संपत्ति हरण केली.

याप्रमाणें कांहीं प्रांत जिंकून आठव्या वर्षी मोठ्या

तयारीनें त्यानें राजगृहावर स्वारी केली, आणि राजधानीस वेढा घातला-परंतु तेथील राजा मथुरेस पळून गेल्यामुळें त्याला परत येणें भाग पडलें. पुढें दोनतीन वर्षें पर्यंत त्यानें हिमालयाच्या बाजूस असलेल्या कांहीं प्रांतावर स्वाऱ्या करून मगध राजास भीती उत्पन्न केली.

यावेळीं मगधावर पुष्यमित्र राज्य करीत होता. मौर्यांचा शेवटचा राजा बृहद्रथ याचा पुष्यमित्र हा सेनापति होता. यानें कृतघ्नपणा करून जैनधर्मद्रोही लोकांच्या सहाय्यानें राजाला पदच्युत करून मगधाचें राज्य बळकावलें होतें. यानेंही ग्रीकसैन्याचा पराभव केला होता. आणि भारतचक्रवर्ति होण्यासाठीं अश्वमेध यज्ञ करून त्यानें आपली सत्ता गाजविली होती. अशा सम्राटांशीं युद्ध करणें म्हणजे कांहीं सामान्य कार्य नव्हतें. परंतु त्याच्या स्वामिद्रोहाचें प्रायश्चित्त देऊन कलिंग जिनमूर्ति परत आणण्या करितां व मगधाचें साम्राज्य मिळविण्या करितां खारवेलनें पुष्यमित्रावर स्वारी केली. मगध साम्राज्याची सत्ता पूर्वीप्रमाणेंच विस्तृत होती व त्यांचें सामर्थ्यही खारवेलापेक्षां पुष्कळ पटीनें अधिक होतें. परंतु आपली महत्वाकांक्षा पुरी करण्याकरितां महापराक्रमी खारवेलानें पुष्यमित्रावर आक्रमण केलें आणि भाग्योदयानें त्याला विजयश्रीनेंही माळ घातली ! अशा विशाल साम्राज्याला पराभूत करून विजय मिळविणें किती तरी महत्वाचें होतें ! आणि या विजयामुळेंच कलिंगची सत्ता विस्तृत

होऊन खारवेल सम्राट बनला !

मगधविजय मिळविल्यानंतर खारवेलाचा दरारा सर्वत्र बसला व त्याची सत्ता कबूल करून त्याच्याशीं स्नेह वाढविण्याचा इतर राजे प्रयत्न करूं लागले. त्याचवेळीं दक्षिणेंतील पांड्य राजानेंही हत्ती, घोडे व बहुमूल्य रत्नादिकांची भेट खारवेलाकडे पाठवून दिली. याप्रमाणें सम्राट खारवेलाची सत्ता मान्य करणाऱ्या साम्राज्याची हद्द पंजाबापासून आसामापर्यंत व विंध्यपर्वतापासून दक्षिणेस पांड्य देशापर्यंत होती.

३ लहानपणापासून अनेक प्रकारचें शिक्षणनैपुण्य मिळविल्यामुळें त्यानें चांगल्या प्रकारें राज्य केलें. उपलब्ध असलेल्या शिलालेखांत त्याच्या अन्यायाचें कोठेंही वर्णन आढळून येत नाहीं. प्रजेंत राजाविषयीं अत्यंत प्रेम होतें. व सर्व कलिंगवासियांचें शौर्य भारतवर्षांत दुमदुमून राहिलें होतें.

खारवेलानें राजधानी अत्यंत सुंदर बनविली होती. त्यानें भव्य राजवाडे बांधून अनेक जिनमंदिरांचा जीर्णोद्धार केला होता. शेती सुधारणेसाठीं पाट बांधिले. आणि कित्येक नवीन तलाव बांधिले. बागबगीचा व नगर सौंदर्य इकडे त्याचें बरेंच लक्ष होतें.

त्यानें प्रजेवरील सर्व कर माफ केले होते. यावरून तो प्रजाहितदक्ष होता असें ह्मणण्यास हरकत नाहीं. नगरसंस्था व ग्रामसंस्था स्थापन करून त्यांना बरेच अधिकार दिले होते. त्यामुळें हल्लीच्या म्युनि-

सिपालट्या व लोकलबोर्ड याप्रमाणें त्या संस्थाकडून बरींच कार्यें होत असत.

सर्व युद्धांत विजय मिळवून कलिंगवासियांनीं जसें शौर्य गाजविलें तसें शांतिसुखाचाही अनुभव घेतला. लोकांच्या मनोरंजनार्थ त्याकाळीं संगीतकलेचा प्रसार बराच झाला होता. निरनिराळया युद्धांत पुष्कळ संपत्ति मिळाल्यामुळें कलिंग देश विपुल संपत्तिमान बनला होता. एकंदरींत खारवेलच्या राज्यांत, संपत्ति, सुख, शांति, आणि वैभव ही विपुल होती यांत शंका नाहीं !

सम्राट् खारवेलनें वयाच्या ३१ व्या वर्षी पांड्य देश जिंकून 'विजिर' (अफगाणिस्थानाचा पूर्व भाग) व 'पुर' (बलुचिस्तानाचा पूर्व भाग) या प्रांतावर स्वारी केली. त्या युद्धांत 'धूषी' नांवाच्या एका रजपूत बालेनें आपल्या पित्याबरोबर युद्धभूमीवर येऊन अपूर्व शौर्य दाखविल्यामुळें तिच्यावर प्रसन्न होऊन खारवेलनें तिला राज्ञीपद दिलें आणि तिच्या पित्यास ' विजिर ' व ' पुर ' प्रांतावर अधिकारी नेमून तो परत आला. ही ' धूषी ' किंवा ' धृष्टी ' नांवाची राणीही जैनधर्मी होती. खारवेल जरी जैनधर्मी होता तरी तो इतर धर्माचा द्वेष करीत नसे. शिलालेखांत असें स्पष्ट लिहिलें आहे कीं, तो सर्व मतांचा मान राखीत असे आणि त्याप्रमाणें त्यानें राजसूय यज्ञही केला होता व त्याचा राज्याभिषेक वैदिकपद्धतीनें झाला होता. त्यानें कित्येक ब्राह्म-

णांना व परधर्मी संस्थांना दानधर्मही केला होता. सौख्य, संपत्ती आणि वैभव याबरोबर परधर्मसहिष्णुता ही खारवेलच्या राज्यांत नांदत असल्यामुळें सुवर्ण सुगंधित झाल्याचा भास होत होता.

खारवेल ज्याअर्थी परधर्मीयांशीं इतक्या प्रेमानें वागत होता तर जैनधर्माच्या उन्नतिसाठीं तो सर्वदा प्रयत्न करीत असेल यांत मुळींच शंका नाहीं. शिलालेखावरून असेंही दिसतें कीं– त्यानें धर्मकर्मादि क्रिया करणाऱ्या व्रती लोकांकरितां कांहीं उत्पन्न दिलें होतें व त्यांच्या विहाराची उत्तम सोय केली होती.

कलिंग देशांतून नंदराजानें जी नयनमनोहर जिनमूर्ती हरण करून नेली होती ती जैनधर्मप्रेमी खारवेलानें परत आणून तिची पुनः प्रतिष्ठा केली. आणि ती स्वारी करण्याला या मूर्तीचें एक कारण होते. असें इतिहासज्ञाचें मत आहे.

ओरिसा प्रांतांत हाथीगुफा नांवाचें एक स्थान आहे, तेथें खारवेल कालचा एक शिलालेख उपलब्ध आहे त्यावरून वरीलप्रमाणें त्याच्या वयाच्या३७व्या वर्षापर्यंतची माहिती मिळते. व दुसरा एक शिलालेख त्याच्या पट्टराणीनें (धृष्टीनें खोदविलेला ‘ मंचपुरीं ’ याठिकाणीं आहे. तीवरून पाहतां खारवेलानें सुमारें वयाच्या ६७ वर्षेपर्यंत राज्य केलें असावें असें अनुमान निघते. मगध विजय करून सम्राटपद मिळविल्यानंतर त्यानें बहुधा युद्ध केलें नाहीं. त्यानंतरचें आयुष्य त्यानें जैनतत्वाप्रमाणें धर्मकार्यात घालविलें, त्यामुळें त्याला

कोणी धर्मराज असेंही ह्मणत.

याचकहो ज्या कलिंग देशांतील जैन वीरांनीं मातृभूमीच्या सेवेसाठीं रणभूमीवर प्राणांची आहुति देऊन स्वातंत्र्यप्रेम व्यक्त केलें आणि धर्मप्रेमी खारवेलनें कलिंग जिनमूर्ति परत आणून भारताचें सम्राटपद मिळविलें, त्या कालिंगवासी जैन वीराचें आणि सम्राटाचें हें चरित्र तुम्हांला पारतंत्र्यापासून परावृत्त करणार नाहीं काय ?

७ सम्राट् कुमारपाल

बाराव्या शतकांत गुजराथेंत सोळंकी वंशीय रजपूत राजे राज्य करीत होते. त्यांची राजधानी अनहिलपुर ही होती. इ. सन ९६१ पर्यंत येथें चावडा वंशीय जैन राजांनीं राज्य केल्यानंतर मूलराज नांवाच्या सोळंकी रजपुतानें अनहिलवाड्याचें राज्य बळकावलें. या वंशांत इ. स. ९६१ पासून ११४३ पर्यंत एकंदर सहा सात राजे होऊन गेले. त्यापैकीं शेवटचा जो सिद्धराज याला पुत्रसंतान नसल्यामुळें त्याच्याच वंशजापैकीं त्रिभुवनपालाचा मुलगा कुमारपाल हा गुजराथच्या सिंहासनावर बसला.

या पृथ्वीवर सत्यनिष्ठ, प्रजाहितदक्ष, नीतिमान्, पराक्रमी किंबहुना बहुगुणसंपन्न असे जे राजे होऊन गेले, त्यांत महाराजा कुमारपाल याचा नंबर फार वरचा आहे. न्याय, दयाशीलता, परोपकार व धर्मप्रतिपालक असा त्याच्यासारखा राजा कचितच ! ह्मणूनच अनेक इतिहासवेत्यांनीं त्याची मुक्तकंठानें स्तुति गाइली आहे. या गुणशाली राजाचा जन्म इ.सन

१०९३ सालीं झाला. आणि वयाच्या सुमारें ५० व्या वर्षीं त्यांचा राज्याभिषेक झाला. या पूर्वीचा बहुतेक काळ धर्मकृत्यें करण्यांत गेला असल्यामुळें त्यांच्या तक्ताभिषिक्त आयुष्यांत त्यांना सर्वगुणसंपन्न ह्मणून कीर्ति गाजवितां आली. राज्याभिषेकानंतर सुमारें दहा वर्षें त्यांनीं आपल्या राज्याची सुव्यवस्था लावण्यांत व दिग्विजय करून आपला अंमल दूरवर पसरविण्यांत घालविलीं. यावरून त्यांच्या पराक्रमाची सहज कल्पना येण्यासारखी आहे. त्यांच्या राज्याच्या विस्तारावरून ते भारतसम्राट बनले होते हें सिद्ध होतें. त्यांच्या राज्यविस्तारासंबंधीं श्रीहेमचंद्राचार्य लिहितात–" महाराजा कुमारपाल यांची आज्ञा पाळणारे, तुर्कस्तानापासून गंगा नदीपर्यंत व दक्षिणेस विंध्याचलापर्यंत अनेक राजे होते. " त्याचप्रमाणें प्रोफेसर मणिलाल नथुभाई द्विवेदी लिहितात कीं, " गुजराथची अनहिलवाडच्या राजाची सत्ता फार प्रचंड होती. दक्षिणेस थेट कोल्हापुरचा राजा त्यांची आज्ञा मानीत होता व त्याच्याकडून भेट येत होती. पश्चिमेस सौराष्ट्र, सिंधु व पंजाबचा बहुतेक भाग गुजराथच्या ताब्यांत होता. पूर्वेस गंगायमुनापार मगध देशापर्यंत त्यांची सीमा होती. व उत्तरेस काश्मीरच्या राजाकडूनसुद्धां भेट येत होती. " राजस्थानच्या इतिहासाचा कर्ता– कर्नल टॉडसाहेब यांना चितोडच्या किल्ल्यांत राणा लक्ष्मणसिंहाच्या मंदिरांत एक शिलालेख मिळाला होता. तो इ० सन १२०७ मध्यें लिहि-

लेला आहे. त्यांत महाराजा कुमारपाल यांच्याविषयीं असें लिहिलें आहे कीं–" महाराजा कुमारपालानें आपल्या पराक्रमानें पृथ्वींतील अनेक मोठमोठ्या राजांना आपल्या आज्ञांकित केलें होतें. त्यानें शाकंभरीच्या राजाला आपल्या चरणीं नमविलें आणि चढा आदि अनेक गढपतींना स्वतः हातांत तलवार धरून जिंकिलें. "

यांची राजधानी अनहिलपुर, तें त्या काळच्या भारतांतील सर्वोत्कृष्ट नगरांत गणलें जात होतें. तेथील व्यापार व कलाकौशल्य यांची मोठी भरभराट झाली होती. असें ह्मणतात कीं, त्या शहरांत १८०० क्रोडाधिपति राहत होते. यावरून अनहिलपुरच्या समृद्धीची सहज कल्पना येण्यासारखी आहे.

त्यांच्या राज्यांतील प्रजा अत्यंत सुखी होती. आपल्या राज्यांतील एकही प्राण्यास दुःखी पाहूं नये अशी त्यांची इच्छा होती. त्यांची प्रजा त्यांना रामाचा दुसरा अवतार समजत होती. यावरून प्रजेचें त्यांच्यावर किती प्रेम होतें हें दिसतें. आपल्या प्रजेची एकंदर स्थिति कशी आहे हें समजून घेण्याकरितां ते स्वतः गुप्तवेशानें फिरत असत. श्रीहमेचंद्राचार्य म्हणतात–"द्ररिद्रता, मूर्खता व मलिनता इत्यादीनें जे लोक पीडित आहेत ते माझ्या राज्यव्यवस्थेच्या हयगयीमुळें कीं अन्य कारणामुळें ? हें समजून घेण्याकरितां राजा स्वतः फिरून चौकशी करीत असे."

याप्रमाणें गुप्तवेषानें फिरत असतां त्यांना जो कोणी दुःखी कष्टी नजरेस पडेल त्याला ते परत राजवाड्यांत गेल्यानंतर बोलावींत असत. व त्याचें दुःख नाहींसें करण्याचा शक्य तो प्रयत्न करीत असत. द्व्याश्रय महाकाव्याच्या शेवटच्या सर्गांत श्रीहेमचंद्राचार्य लिहितात–"एकदां महाराज कुमारपाल यांनीं असें पाहिलें कीं–एक मनुष्य पांच सहा मेंढरांना बांधून ओढून नेत होता. तीं बिचारीं आर्तरव करीत होती. व तो निर्दयतेनें त्यांना फरकटत नेत होता. महाराजांनीं त्याला विचारलें–'तूं या बिचाऱ्या मेंढरांना कोठें नेत आहेस ?' तो म्हणाला–'मी यांना कसाईखान्यांत नेऊन जें कांहीं उदरनिर्वाहाला मिळेल तें पहातो–' हें ऐकून महाराजांना अत्यंत दुःख झालें. ते खिन्न मनानें विचार करूं लागले कीं, मी प्रजापति म्हणवून घेतो आणि माझ्या राज्यांत अशा प्राण्यांचें नित्यशः प्राणहरण होत आहे ! धिःकार असो माझ्या या जीवनाला ! असें म्हणत ते परत राजवाड्यांत आले. व त्यांनीं एक दरबार भरवून सर्व अधिकाऱ्यांना अशी सख्त ताकीद दिली कीं–"जो खोटी प्रतिज्ञा करतो त्याला शिक्षा द्यावी. परस्त्रीलंपट होणाऱ्यांना त्याहून अधिक शिक्षा व जो जीवहिंसा करतो त्याला अत्यंत कठोर शिक्षा द्यावी." याप्रमाणें अधिकाऱ्यांना सांगितल्यानंतर सर्व राज्यांत त्या आशयाचीं आज्ञापत्रकें निघालीं–महाराजा कुमारपालांच्या इच्छेप्रमाणें ही पत्रकें थेट लंकेपर्यंत पोहोंच-

ली होती. या कायद्यामुळें कसायासारखा व्यवसाय करणाऱ्या ज्या लोकांचें नुकसान झालें त्यांना तीन तीन वर्षें पुरेल इतकी अन्नसामग्री दिली. सर्वत्र मद्यपानबंदीही झाली व यज्ञकार्यांतही पशुहिंसा (बलि) न देतां त्याऐवजीं अन्नतर्पण सुरू झालें. याच्या पुष्ट्यर्थ प्रो० मणिलाल यांचें पुढील ह्मणणें पहा—"कुमारपालानें जेव्हां जीवहिंसा बंदीची घोषणा सुरू केली तेव्हां यज्ञांतील मांसबलि बंद होऊन यव हवन करण्याची प्रथा पडली. लोकांच्या मनांत दया धर्माविषयीं प्रेम उत्पन्न झालें. मांसभोजन इतकें त्याज्य व निषिद्ध समजूं लागले कीं, बंगाल व पंजाब इत्यादि प्रांतांतील हिंदु ह्मणविणाऱ्यापैकीं एकादाच कोणीतरी मांस खाणारा भेटला असता, परंतु गुजराथेंत मांसाचा वास आला तरी ताबडतोब आंघोळ केली जात असे. इतकी लोकांची अहिंसा वृत्ति झाली होती. आणि त्याचें प्रत्यंतर आजही गुजराथ प्रांतांत पहावयाला मिळेल. (पहा द्व्याश्रय काव्य, गायकवाड स्मारकांतून प्रसिद्ध झालेलें)

एकदां महाराज कुमारपाल झोपी गेले होते, इतक्यांत त्यांच्या कानीं कोणाच्या रडण्याचा सूर ऐकूं आला. ते चटकन् उठले आणि रात्रीच्या समयीं एकटेच त्या स्थानाकडे निघून गेले. पाहातात तों एक स्त्री रडत असलेली त्यांच्या दृष्टीस पडली. चौकशी करतां समजलें कीं– ती एका धनाढ्याची पत्नी असून तिचा पति व पुत्र दोघेही मृत्यु

पावले आहेत. व त्यासाठीं ती दुःख करीत होती. राज्यांत पूर्वीपासून असा एक नियम होता कीं, संततिहीन मनुष्याची मालमत्ता राजाच्या मालकीची असते. आणि त्या नियमाप्रमाणें ही सर्व इष्टेट राज्याधीन झाल्यानंतर आपण कसा निर्वाह करावा! असें ती ह्मणूं लागली. याचवेळीं मरण आलें तर बरें होईल असें ती ह्मणत होती. तो प्रकार पाहून महाराज तिला ह्मणाले "बाई तूं दुःख करूं नकोस व मरणाचीही इच्छा करूं नकोस. तुझी संपत्ति राजा कधींही घेणार नाहीं. तूं आपल्या इच्छेप्रमाणें धर्मकृत्यांत तिचा व्यय कर." असें सांगून महाराज परत आले. व विचार करूं लागलें कीं, या प्रकारच्या क्रूर कायद्यांनीं माझ्या प्रजेला किती दुःख सहन करावें लागत आहे बरें? निःसहाय होणाऱ्यांची संपत्ति हरण करून त्यांना जास्तच दुःखी करावें हें उचित नाहीं असा विचार करून त्यांनीं तो पूर्वापार चालत आलेला कायदा रद्द करण्याचें ठरविलें. त्यांनीं अधिकाऱ्यांना बोलावून असा नियम केला कीं—"निःसंतान मनुष्याच्या मृत्यू नंतर त्याची संपत्ति राज्य घेत आहे हा नियम अत्यंत दारुण आहे यामुळें कित्येक लोकांना दुःख होत आहे. ह्मणून हा नियम बंद केला पाहिजे! अशानें राज्याचें उत्पन्न कमी आलें तरी हरकत नाहीं." धन्य त्याच्या प्रजाहितदक्षतेची! कीं ज्यानें प्रजेच्या सुखासाठीं अहोरात्र प्रयत्न करून स्वार्थत्याग केला!! त्यांच्या इच्छे-

प्रमाणें अधिकाऱ्यांनीं तो नियम रद्द केला व कित्येक कर माफ केले व कित्येक कमी केले. त्यामुळें त्यांच्या प्रजेच्या आनंदाला पारावार उरला नाहीं. ! ह्मणूनच ते त्याला राम राजाचा अवतार ह्मणत होते !

महाराजांची प्रजाहितदक्षता व राजनीति जशी उत्कृष्ट प्रकारची होती, त्याचप्रमाणें त्यांची धर्मावरील भक्तिही अवर्णनीय होती. ते जितेंद्रिय व ज्ञानवान् होते. मूलतः जरी ते जैनधर्मी होते, तरी आचार्य हेमचंद्रजींच्या धर्मोपदेशामुळें त्यांची जैनधर्मावरील श्रद्धा अत्यंत वाढली होती. ते कोणाही जीवाला आपल्या हातून त्रास होऊ नये ह्मणून शक्य तितका प्रयत्न करीत. त्यांनीं कधींही असत्य भाषण केलें नाहीं. त्यांचें मन इतकें निर्विकारी होतें कीं, प्रत्यक्ष आपल्या राणीशिवाय जगांतील सर्व स्त्रिया ते आपल्या माताभगिनीप्राणें समजत असत. त्यांची राणी भोपलदेवी मरण पावल्यानंतर ते आजन्म ब्रह्मचारी राहिले. दीनदुःखी लोकांच्या दुःखहरणार्थ व असमर्थ श्रावक लोकांच्या निर्वाहार्थ त्यांनीं प्रतिवर्षी लाखो रुपये खर्च केले. लाखो रुपये खर्चून त्यांनीं जैनशास्त्रभंडार स्थापन केलें. व जैनशास्त्रांचा उद्धार केला. हजारो पुरातन जैनमंदिरांचा जीर्णोद्धार केला व कित्येक नवीन मंदिरें निर्माण करून भारतभूमि सुशोभित केली. तारंगादि तीर्थक्षेत्राच्या ठिकाणीं बांधलेलीं उत्कृष्ट विशाल मंदिरें आजही त्यांच्या जैनधर्मप्रेमाची साक्ष देत आहेत. एकंदरींत त्यांनीं

ज्याप्रमाणें राज्यविस्तार केला, प्रजा सुखी केली, त्याप्रमाणेंच जैनधर्माचा जगांत प्रसार केला ! एक इंग्रज विद्वान् ह्मणतो— " कुमारपालानें जैनधर्माचें उत्कृष्ट प्रकारें पालन केलें व आपलें सर्व राज्य एक आदर्श जैन राज्य बनविलें. "

अशा महापराक्रमी व गुणवान् कुमारपाल राजानें वयाच्या ७९ व्या वर्षापर्यंत राज्य केलें. इ० सन ११७४ सालीं त्यांच्या आप्तसंबंधीं अजयपाल नांवाच्या तरुणानें त्यांचा विश्वासघात केला. व अशा रीतीनें या न्यायी आणि दयाशील प्रति–रामराजाचा अंत झाला.

सुप्रसिद्ध इतिहासज्ञ रायबहादुर महामहोपाध्याय पं० गौरीशंकर ओझा, या भाग्यशाली पुण्यपुरुषाचें चरित्र लिहितांना ह्मणतात कीं—

"(१) यांनीं आपल्या राज्यकालांत १५०० जिनमंदिरें बांधिलीं व १६००० जिनमंदिरांचा जीर्णोद्धार केला. १४४४ जिनमंदिरावर सोन्याचे कळस चढविले. ९८ लक्ष रुपये इतर दानधर्म केला. सात वेळां संघाधिपति होऊन तीर्थयात्रा केली. त्यापैकीं पहिल्या तीर्थयात्रेच्या वेळीं नऊ लाख रुपये किंमतीचीं नऊ रत्नें प्रभुपदीं वाहिलीं. यांनीं एकंदर २१ शास्त्रभांडार स्थापन केले.

(२) ७२ लक्ष रुपये श्रावक लोकांचा कर दरवर्षी माफ केला व इतरांचाही पुष्कळ कमी केला.

(३) धनहीन लोकांसाठीं दरसाल एक करोड रुपये खर्च केले.

(४) पुत्रहीन विधवा स्त्रियांचें धन राज्यांत जमा होत असे तें कायद्यानें बंद केलें. त्याचें उत्पन्न दरसाल सुमारें ७२ लाख होते.

(५) जुगार, चोरी, मांसभक्षण, मद्यपान, वेश्या, परस्त्री, आणि शिकार हीं दुर्व्यसनें नाहींशी करण्याचा शक्य तितका प्रयत्न केला.

(६) अहिंसा धर्माचा प्रसार फक्त आपल्या राज्यांत नव्हे तर भारतवर्षांतील १८ लहान मोठ्या देशांत होऊन सर्वत्र दयाधर्माचेंपालन होऊं लागलें. धर्माच्या नांवावर देवतेपुढें होणारा पशुबलि बंद केला.

(७) शांतिमय अहिंसा धर्माचा प्रसार करीत असतां ज्यांचें नुकसान झालें त्यांची नुकसान भरपायी करून दिली.

(८) गरिबांचें कष्ट दूर करण्यासाठीं राज्यांत एक दानशाला स्थापन केली होती.

(९) स्वदारसंतोषव्रत पालन केल्यामुळें **परनारी सहोदर** " शरणागताचें पालन केल्यामुळें " **शरणागत वज्र पंजर** " जीवदयेचा प्रसार केल्यामुळें " **जीवदाता** " विचारशील होता ह्मणून "**विचार-चतुर्मुख**" दीनांचा पालनकर्ता ह्मणून " **दीनोद्धारक** " त्रिकाल देवपूजा, गुरुसेवा व शास्त्रश्रवण, इंद्रियसंयम, धर्मप्रभावना इत्यादि श्रावककर्में करूनही उत्कृष्ट प्रकारें राज्य केलें ह्मणून **राजर्षि** याप्रमाणें त्यांच्या गुणानुसार त्यांना विद्वान् लोक अनेक नांवानीं संबोधित असत.

सारांश सम्राट कुमारपालाचें राज्य ह्मणजे शांतिसाम्राज्य होतें. आणि त्याच्या प्रजेंत सर्व प्रकारें सौख्य, आणि प्रसन्नता होती हें पाहून कलियुगांतही सत्ययुग सुरू झाल्याचा भास होत होता.

(उदयपुरका इतिहास)

सम्राट कुमारपालांच्या वधानंतर सोळंकी वंशांतील जैनधर्म नष्ट झाला. प्रत्यक्ष देवस्वरूपी राजाचा परधर्मी लोकांच्या शिकवणीमुळें राज्यलोलुपी अजयपालानें खून केल्यानंतर तेथें सत्यधर्म कसा राहील ? पितृहंता अजयपाल जैनधर्म सोडून कुमार्गानें वागूं लागला. लवकरच त्याच्या हातून चितोडकिल्ला नाहींसा झाला आणि शेवटीं या वंशांतून राज्य नाहीसें झालें.

वाचकहो ! ज्या कुमारपालानें अहिंसेचा सर्व देशांत प्रसार केला होता त्यानेंच अनेक युद्धांत समशेर गाजवून देश जिंकिले होते. यावरून 'अहिंसा' भित्रपणा शिकवीत नसून वीरत्व व अनाथरक्षण शिकविते हें सिद्ध होत नाहीं काय ?

उपसंहार

वाचकांपुढें या सात सम्राटांच्या चरित्राचा आराखडा ठेविला आहे. तो वाचतांना थोडासा जो मतभेद झाल्याप्रमाणें वाटत असेल त्यासंबंधीं खुलासा करणें जरूर आहे. पहिलें चरित्र चक्रवर्ति भरताचें असून त्याचा काल अत्यंत

प्राचीन आहे. 'त्यावेळीं जैनधर्म होता काय ?' अशी कोणाला शंका येईल पण 'जैनधर्म त्यावेळींही होता !' एवढेंच सांगण्यापेक्षां येथें जास्ती कांहींच लिहितां येत नाहीं, कारण तो स्वतंत्र विषय असून त्यावर 'जैनधर्माचें प्राचीनत्व' ह्मणून इंग्रजी व मराठींत पुष्कळ वाङ्मयही उपलब्ध झालें आहे. शंका वाटणाऱ्यांनीं त्याचें अवलोकन करावें एवढेंच सुचवून ठेवतों.

या पुस्तकांत ज्या सम्राटांचीं चरित्रें लिहिलीं आहेत, ते सर्व अहिंसाधर्मी व जैन होते हें कोणालाही नाकबूल करतां येणार नाहीं, फक्त अशोकासंबंधीं 'तो बौद्ध होता कीं जैन ?' असा प्रश्न उद्भवणें साहजिक आहे. परंतु त्याही बाबतींत अलिकडे पुष्कळ शिलालेख व ऐतिहासिक आधार असे सांपडले आहेत कीं, त्यावरून अशोक हा जैनधर्मीच होता असें सिद्ध होतें. (बाबू कामताप्रसादजी यांचीं इतिहास पुस्तकें पहा. चंद्रगुप्त, राजा श्रेणिक, बिंदुसार, कुमारपाळ व खारवेल यांच्या जैनत्वासंबंधीं मतभेद होण्याचीं कारणें नाहींत. राजा कुमारपाळ ह्यानें श्वेतांबर जैनधर्माचा प्रसार केला. हेमचंद्राचार्यांनीं द्व्याश्रयकाव्यांत याचें विस्तृत चरित्र लिहिलें आहे. हे श्वेतांबराचार्य होते.

अहिंसेमुळें जैन लोकांनीं राष्ट्ररक्षण न करतां स्वातंत्र्याचा नाश केला, असें पुष्कळांना वाटतें. याचें कारण त्यांना जैनधर्मी क्षत्रियांची माहिती मुळींच नाहीं. व जै-

नांच्या अहिंसेसंबंधीं तर त्यांचा फारच विपरीत ग्रह आहे. परंतु भरताचें पहिल्यापासून रक्षण करणारे राजे अहिंसा धर्मीच होते. व त्यांनीं अनेक युद्धें करून राष्ट्रक्षण व स्वातंत्र्यरक्षण केलें आहे. हें या सप्त सम्राटांच्या चरित्रावलोकनानें कळून येईल.

या छोट्या व त्रोटक माहितीच्या पुस्तकानें वाचकांना शंका उत्पन्न होऊन या बाबतींत पूर्ण माहितीनें भरलेलीं पुस्तकें वाचण्याची व सत्येतिहास जाणण्याची इच्छा झाली, ह्मणजे माझें कार्य एवढ्यानेंहीं यशस्वी होणार आहे.

※ समाप्त. ※

श्री० आ० भा० मगदूम (वीरानुयायी) यांचीं इतर पुस्तकें.

१ भगवान् महावीर.	८३
२ कृष्णकुमार वीर प्रद्युम्न.	८४
३ श्री नेमिसागर चरित्र.	८२
४ जैनवीर स्त्रिया.	८४
५ नादलहरी (तीस कवींच्या- कवितांचा संग्रह)	८१२

संकलित—

सम्राट खारवेल.

ही कादंबरी लवकरच प्रसिद्ध होईल.

पत्ता- आ. भा. मगदूम
से०— जैनमहाराष्ट्र कविमंडळ, सांगली.